


दैनिक
अचूक वेध,अचूक बातमी
# अक्षराज
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
Email : newsaksharaj2021@gmail.com




वर्ष : ०५ | अंक : २०५, पाने : ०६, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, रविवार, दि.०८ मार्च २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056



# इस्त्रायल-इराण युद्ध थांबले पाहिजे!



इराण मधील मिनाब प्रांतातील शजरेह तय्येबे मुलींच्या प्राथमिक शाळेवर क्षेपणास्त्र कोसळले . यात १६० विद्यार्थी मरण पावले. हे खरोखरच हृदयद्रावक आहे. या निष्पाप मुलांना इराण-इस्त्रायल युद्ध कशासाठी सुरू आहे हे सुद्धा माहीत नव्हते. अणु-अस्त्र कार्यक्रम, धार्मिक कट्टरतावाद, तेलाचे आंतरराष्ट्रीय राजकारण या गोष्टींबाबत त्यांना काहीच माहिती नव्हती. युद्धामुळे इराणमधील अण्वस्त्र कार्यक्रम थांबेल असा दावा करणारे अमेरिका आणि इस्त्रायल हे देश भविष्यातील जगभरातील शांततेसाठी वर्तमान मात्र अशांत बनवत आहेत . हे युद्ध त्वरित थांबणे मानवतेसाठी अत्यावश्यक बनले आहे. या युद्धाच्या झळा संपूर्ण जगाला सोसाव्या लागणार आहेत.

इराण आणि ओमन या देशा दरम्यान असणाऱ्या होर्मुझच्या खाडीतून जगभरातील एकूण तेलापैकी ३० टक्के तेलाची वाहतूक होते. जवळपास दीड कोटी बॅरल प्रतिदिन इतक्या प्रमाणात तेलाची वाहतूक येथून होते. इराण, इराक, कुवेत, कतार, सौदी अरेबिया आणि यूएई या देशांत निर्मित होणाऱ्या तेलाची वाहतूक या खाडीतून होते. भारताच्या एकूण तेलपुरवठ्यापैकी ४० टक्के तेल होर्मुझच्या खाडीतून येते. या समुद्रधुनीची रुंदी सुमारे ३३ किलोमीटर आहे. इराणने आपल्या शेजारील देशांवर सुरू केलेल्या हल्ल्याचा परिणाम म्हणून सौदी अरेबियाने रास तनुरा रिफायनरी ही जगातील सर्वात मोठी तेल शुद्धीकरण रिफायनरी बंद केली आहे. कतार या जगातील सर्वात मोठ्या नैसर्गिक वायू संपन्न देशाला देखील आपले उत्पादन थांबवावे लागले आहे. जगभरातील ऊर्जा बाजार आता भडकला आहे. जे खनिज तेलाचे दर ६० ते ६५ डॉलर्स प्रति बॅरल होते, ते आता ८५ डॉलर्सवर गेले आहेत. पुढील काळात ते १०० डॉलर्सपर्यंत जातील, असा तज्ज्ञांचा अंदाज आहे. पुढील काळात भारतासह जगभरात इंधनाची टंचाई निर्माण होऊ शकते. होर्मुझच्या नाकेबंदीचा सर्वाधिक फटका एलपीजी आयातीला बसेल आणि याबाबत पर्यायी स्रोतांचा शोधही शक्य नाही. एलपीजी गरजेपैकी ८०-८५ टक्के भारताला आयात करावी लागते. यातील बहुतेक सर्व एलपीजी होर्मुझमधूनच येतो. त्यामुळे पुढील काळात जगभरात ऊर्जा संकट निर्माण होऊन भूकबळी, महागाई, बेरोजगारी आणि देशांतर्गत यादवी यांसारख्या नवीन समस्या निर्माण होऊ शकतात.

इस्त्रायल आणि अमेरिकेच्या क्षेपणास्त्र माऱ्यात इराणचे सर्वोच्च नेता आणि धर्मगुरू अयातुल्ला खामेनी ठार झाल्यामुळे या युद्धाचा भडका उडाला आहे. तो आता विझण्याचे नाव घेत नाही. अयातुल्ला खोमेनी यांच्या शासनाविरुद्ध २०२२ मध्ये इराणमधील जनतेने आंदोलन केले होते. महागाई आणि बेरोजगारीमुळे त्रस्त झालेल्या जनतेने केलेले हे उत्स्फूर्त आंदोलन क्रूरपणे दडपून टाकण्यात आले. यात हजारो आंदोलनकर्ते ठार करण्यात आले. खोमेनी राजवट लोकशाहीविरोधी, स्त्रियांविरोधी आणि कट्टरपंथी असली तरी तिला पदच्युत करण्याचा अधिकार बाहेरील कोणत्याही देशाला नाही. इराणच्या निर्णयस्वातंत्र्यावर आणि सार्वभौमत्वावर हल्ला करणे म्हणजे आंतरराष्ट्रीय नियमांची पायमल्ली होय. कोणत्याही देशाने दुसऱ्या देशावर लष्करी हल्ला करू नये किंवा त्याला धोका निर्माण होईल अशा प्रकारे लष्कराचा वापर करू नये, असा स्पष्ट नियम संयुक्त राष्ट्रसंघाने बनवलेला आहे.

खरंतर इराण या युद्धासाठी तयार होता. जून २०२५ मध्ये झालेल्या बारा दिवसांच्या युद्धापासून धडा घेत इराणने आपल्या सेनादलांची संस्थात्मक पुनर्रचना केली होती. कमांडचे विकेंद्रीकरण केले होते. आता सर्वोच्च नेता गमावूनसुद्धा इराण माघार घेण्याचे नाव घेत नाही. उच्च दर्जाच्या बॅलेस्टिक, क्रूझ आणि हायपरसॉनिक क्षेपणास्त्रांची श्रेणी चीन आणि रशियाने इराणला पुरवली आहे. त्याचबरोबर बायडू या चिनी उपग्रहाची २४ तास सेवा देखील इराणला मिळत आहे. इराणने आता इस्रायलवर क्षेपणास्त्रांचा मारा सुरू ठेवणे आणि पश्चिम आशियातील अमेरिकन लष्करी तळांना लक्ष्य करणे ही युद्धाची रणनीती आखली आहे. त्याचाच भाग म्हणून इराणने यूएई, सौदी अरेबिया, कुवेत, कतार, बहरीन आणि ओमान या देशांवर हल्ले करण्यास सुरुवात केली आहे.

भारताचे सुरक्षा हितसंबंध पश्चिम आशियाशी घट्ट जोडलेले आहेत. या आखाती देशांमध्ये भारताचे सुमारे एक कोटी पासपोर्टधारक नागरिक राहतात. त्यांची सुरक्षितता सुनिश्चित करणे आता अत्यंत महत्त्वाचे काम आहे. त्याचबरोबर इस्रायलशी देखील भारताचे चांगले संबंध आहेत. त्यामुळे पुढील काळात भारताने सावधगिरीने आपल्या देशाच्या हितसंबंधांचे रक्षण करत मानवतेच्या रक्षणाची जबाबदारीही पार पाडली पाहिजे. भारतीय राज्यघटनेच्या अनुच्छेद ५१ नुसार आंतरराष्ट्रीय वादांचे निराकरण चर्चा आणि संवादाच्या शांततामय मार्गाने व्हावे, असे भारताचे परराष्ट्र धोरण आहे. याची जाणीव ठेवून आणि वसुधैव कुटुंबकम् ' म्हणजेच हे विश्वचि माझे घर या आदर्शाचा पुरस्कार करत भारताने कृती करणे आवश्यक आहे.

**- किशोर जाधव**

# ‘वंदन’ ‘नारी-शक्ती’ ला...





**अनंत बोरसे**
**शहापूर जिल्हा ठाणे**
**मोबा. ९१५८४९५०३७**

आज सगळीकडे जागतिक महिला दिन साजरा होत आहे, आज 'ती' चा गुणगौरव गायले जातील, ती च्या सन्मानाच्या गोष्टी होतील, सोहळे समारंभ होतील, महिला राज चे गोडवे गायले जातील, ती किती शक्तीशाली आहे, कर्तृत्वान आहे हे सांगण्याची चढाओढ लागेल. ती' बेटी आपल्या पैकी कुणाची लाडकी लेक असते, कुणाची तरी अर्धांगिनी बनते, माता बनते, आजीच्या भुमिकेत आपले कर्तव्य पार पाडते, कुटुंब जोडते, पिढी घडवते, समाज घडवते. जिच्या हाती पाळण्याची दोरी ती जग उद्धारी'असे जीचे वर्णन केले जाते ती 'देश की बेटी' आज राजकारण, शिक्षण, आरोग्य, विज्ञान, तंत्रज्ञान, साहित्य, कला, सामाजिक क्षेत्रात अंतराळात भरारी अशा विविध श्रेत्रात आपला ठसा उमटवित आहे,उच्च शिक्षण घेते आहे, जगाला गवसणी घालते आहे.जगाच्या, देशाच्या, समाजाच्या जडणघडणीत आपले मोलाचे योगदान देत आहे, आपली जबाबदारी यशस्वीपणे पार पाडत आहे, प्रत्येक संकटाला धीराने तोंड देत पुढे जात आहे.' ती'ने केवळ' चुल आणि मुल' च सांभाळावे, ती ने शिकु नये ही आपली पुर्वीच्या काळी असलेल्या सामाजिक व्यवस्थेत आज अमुलाग्र बदल झाला आहे, जी' च्या कार्याचा गौरव म्हणून दरवर्षी ८ मार्च हा दिवस जागतिक पातळीवर' महिला दिन 'साजरा केला जातो.अर्थात 'ती 'च्या परिवर्तनाचे श्रेय, सावित्रीबाई फुले,डॉ. आनंदीबाई जोशी, महात्मा ज्योतिबा फुले, यांच्या सारख्या तत्कालीन समाज सूधारकांकडे मोठ्याप्रमाणावर जाते.देशात आपले कर्तुत्व सिद्ध करणाऱ्या महिलांची मोठी संख्या आहे. छत्रपती शिवाजी महाराजांसारख्या महापुरुषाला जन्म देणाऱ्या माता जिजाऊ, अहिल्याबाई होळकर, झाशीच्या राणी लक्ष्मीबाई, रमाबाई रानडे, यांच्या पासुन ते अलिकडच्या काळातील विजयालक्ष्मी पंडित, कै. इंदिरा गांधी, थोर समाजसेविका सिंधुताई सपकाळ, अवकाशात भरारी घेणारी कल्पना चावला, क्रिडा क्षेत्र गाजविणाऱ्या पी. टी उषा, मेरी कोम, रेल्वे चालविणारी सुरेखा यादव,लता मंगेशकर, अशा अनेक कर्तृत्ववान महिलांची मोठी यादी ही देशाची शान आहे, अभिमान आहे. आजची' ती' तर घराचा उंबरठा ओलांडून ती आता घर आणि दार देखील सांभाळुन लागली आहे. महाराष्ट्राच्या प्रतिभाताई पाटील, द्रोपदी मुर्मु या तर देशाचे राष्ट्रपतीपद भुषवित आहेत.

त्याच वेळी आजची नारी ना देशात सुरक्षित आहे ना राज्यात.रोज कुठे ना कुठे 'ती' अत्याचार, बलात्कार, कौटुंबिक हिंसाचाराची बळी ठरत आहे, 'ती' कुठेच सुरक्षित नाही हे पुण्यातील घटनेने पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे. स्वारगेट सारख्या चोवीस तास वर्दळ असलेल्या भागात चक्क बस स्थानकावर जिथे अनेक सुरक्षारक्षक असतात, तिथे एक नराधम बस मधे एका तरुणीवर अत्याचार करतो काय आणि बिनधास्तपणे निघून जातो काय हे सगळे भयानक वास्तव आहे. देश व राज्य पातळीवर महिला व बालकल्याण मंत्रालय, केंद्र व राज्य पातळीवर महिला आयोग कार्यरत आहे, तरी देखील अशा घटनांना आळा बसतांना दिसत नाही. काही वर्षांपूर्वी मणिपूर मधील महिलांवरील अत्याचारांच्या घटनांनी देशाला हादरवून सोडले होते, पश्चिम बंगाल, असो कि देशात अन्य ठिकाणी मोठ्याप्रमाणावर महिलांवर अत्याचार होत आहे. त्याचबरोबर पुण्या सारख्या सुसंस्कृत शहरात काही तरुणी नशेच्या आहारी सापडल्या तसेच अनेक महिलां भ्रष्टाचार, समाजविघातक कृत्यांमध्ये सहभागी होत आहे हे निश्चितच नारी शक्ती ला शोभनीय नाही. ऐकिकडे नारी देवीच्या रूपात पुजली जाते तर दुसरीकडे समाजातील काही विकृती मानसिकतेकडुन 'ती' ची विटंबना केली जाते. केवळ एक दिवसाचा महिला दिन साजरा करुन काय साध्य होते. महिलांना सत्तेत आरक्षण मिळावे असे सगळेच सांगतात, मात्र तशी इच्छाशक्ती कोणाचीच दिसत नाही म्हणूनच आजवर महिला आरक्षणाबाबत केवळ चर्वितचर्वण चालु आहे.केंद्र सरकारने गेल्या वर्षी नारी शक्ती वंदन कायदा मंजूर केला आहे, या कायद्यामुळे महिलांना लोकसभा, विधानसभेमधे प्रतिनिधीत्व मिळणार आहे,ही स्वागतार्ह बाब आहे मात्र या कायद्याची अंमलबजावणी कधी होणार या बाबत साशंकताच आहे. समाधानाची बाब म्हणजे आज देशाच्या राष्ट्रपती द्रोपदी मुर्मु या महिला आहेत. पण भारत की बेटी'ना राज्यात सुरक्षित आहे ना देशात,' ती'कुठेच सुरक्षित नाही हे कटु वास्तव आहे.पंचायत राज कायदा आल्याने स्थानिक स्वराज्य संस्था, ग्रामपंचायत जिल्हा परिषद यामधे महिलांना राजकीय आरक्षण मिळाले, मात्र विधानसभा आणि लोकसभेत तसे आरक्षण लागू नाही. महिलांना सत्तेत आरक्षण मिळावे असे सगळेच सांगतात, मात्र तशी इच्छाशक्ती कोणाचीच दिसत नाही म्हणूनच आजवर महिला आरक्षणाबाबत केवळ चर्वितचर्वण चालु आहे.केंद्र सरकारने गेल्या वर्षी नारी शक्ती वंदन कायदा मंजूर केला आहे, या कायद्यामुळे महिलांना लोकसभा, विधानसभेमधे प्रतिनिधीत्व मिळणार आहे,ही स्वागतार्ह बाब आहे मात्र या कायद्याची अंमलबजावणी कधी होणार या बाबत साशंकताच आहे. राज्याने शक्ती कायदा केला मात्र तो केंद्रीय पातळीवर रखडला आहे. गेल्या काही वर्षांपासून राज्यातुन बेपत्ता होणाऱ्या महिला, मुली यांची आकडेवारी तसेच महिला व मुलीवरील अत्याचाराच्या घटनां राज्याच्या लौकिकास शोभनीय नाहीत.

आजची नारी ही सर्वार्थाने शक्तीमान आहे, सर्व श्रेत्रात आपले कर्तृत्व सिद्ध करण्यास ती सज्ज आहे, ती समाज घडवते, कुटुंब देश चालवते सर्व समाजात अनेक महिलांनी विविध श्रेत्रात आपल्या कामाचा ठसा उमटविला आहे, आपली ओळख निर्माण केली आहे, भविष्यात अशीच वाटचाल सुरू रहाणार आहे. समाज व्यवस्थेत ५०% इतका वाटा असलेल्या महिलांबाबत समाजातील चित्र 'कभी खुशी कभी गम सारखे 'आहे आणि केवळ कायदे करून, यंत्रणां ऊभारुन, कागदी घोषणा, जाहिरातबाजी हे पुरेसे नाही तर समाजातील मानसिकता बदलायला हवी.'ती'ला सुरक्षित वातावरण हवे आहे दुर्दैवाने तसे वातावरण नाही हे कटु वास्तव आहे.

**जागतिक महिला दिना निमित्त समस्त 'नारी शक्ती' ला वंदन...**

## महिला

सावित्रीरमा जिजाई
स्मरण महिला दिनी
बा अहिल्या चेन्नमा
इतिहास ठसवे मनी

राहीलतासिंधुआशा
किती नावे ये ध्यानी
आशा फातिमा मिरा
मदर तेरेसा गं ग्यानी

हिमाउषा मेरी स्मृती
गिता क्रीडारणांगणी
कल्पनाअंतराळामधे
गुजगोष्ट गं तारांगणी

मुर्मु प्रतिभा राष्ट्रपती
निर्मला अर्थआखणी
इंदिरा सुषमा प्रतिभा
कैकनारीराजकारणी

स्मृती मंधाना अव्वल
गाजते क्रिकेटअंगणी
कितीनावे घ्यावयाची
बहगुणी नारी नोंदणी


जना मुक्ता बहिणाई
समृध्द सुधा लेखणी
गौरीशांताशशीशोभा
कारकीर्द करे देखणी

सर्व क्षेत्री अग्रस्थानी
नारी कुठे नाही उणी
मुलगी ज्याच्या वंशा
तो भगवंताचा ऋणी

**- हेमंत मुसरीफ, पुणे.**
**९७३०३०६९९६**

अक्षराज
अचूक वेध अचूक बातमी

# खामेनींसाठी दुखवटा हे एक-दोन दिवसांसाठी जोश निर्माण करणारे...



इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खामेनी यांचा अमेरिका आणि इस्त्रायल यांनी केलेल्या हल्ल्यात मृत्यू झाल्यानंतर भारतामध्ये त्यांच्या मृत्यूबद्दल शोक व्यक्त करण्यासाठी आणि अमेरिका-इस्त्रायलचा निषेध करण्यासाठी ठिकठिकाणी मुस्लीम धर्मियांचे मोर्चे निघाले. काश्मीरमध्ये याला हिंसक वळण लागले. सार्वजनिक मालमत्तेची तोडफोड करण्यात आली. पाकिस्तानातही असेच आक्रमक निषेध मोर्चे निघाले, त्यावेळी आंदोलकांनी अमेरिकेच्या वकिलातीत घुसून तोडफोड करण्याचा प्रयत्न केला तेव्हा तिथे तैनात असलेल्या अमेरिकी सैनिकांनी त्यांच्यावर गोळीबार केला. त्यात आठ आंदोलक ठार झाले. खामेनी हे इराणचे जसे नेते होते, तसेच ते मुसलमानांच्या शिया पंथीयांचे धार्मिक प्रमुख होते. त्यामुळे त्यांना मानणारे जगभरात जे मुसलमान आहेत, त्यांनी काही ठिकाणी आपल्या शोकभावना व्यक्त केल्या. पण खामेनी यांचे धार्मिक नेते पद ही बाब सोडली तरी त्यांनी इराणची सत्ता हाती घेतल्यावर इराणमध्ये जे काही धार्मिक कट्टरवादी नियम लागू केले, त्यामुळे नागरिकांच्या व्यक्तिस्वातंत्र्यावर गदा आली. विशेषतः महिलांचे व्यक्तिस्वातंत्र्य पार पायदळी तुडविले गेले. त्यामुळे खामेनी यांचा मृत्यू झाल्यानंतर आता तरी आपल्याला व्यक्तिस्वातंत्र्य मिळेल, मोकळेपणाने वावरता येईल, असे तिथल्या नागरिकांना वाटू लागल्याने त्यांनी नाचून गाऊन आनंद व्यक्त केला. अमेरिका आणि इस्त्रायलच्या इराणवर होत असलेल्या हल्ल्याचे इराणमधील नागरिकांना दुःख तर आहेच, कारण त्यामुळे त्या देशाचे नुकसान होत आहे, नागरिक मारले जात आहेत, पण त्याच वेळी धर्माच्या नावाने आपले अधिकार हिरावून घेणारे खामेनी गेले, याचाही त्यांना आनंद आहे. खामेनी हे शिया पंथीय होते. तसे पाहू गेल्यास इराण हा शिया पंथीयबहुल देश आहे. पण त्याच आखातात इराणच्या भोवती असलेले काही मुस्लीम देश हे सुन्नी पंथीय आहेत. त्यामुळे जरी आखातात मुस्लीम देश असले तरी त्यांच्या शिया आणि सुन्नी या पंथभेदामुळे वाद आहेत. यातील काही देशांनी शिया पंथीयांचे प्रमुख म्हणून खामेनी यांच्याविरोधात अमेरिका आणि इस्त्रायलला मदत केलेली होती, असे मानले जाते.

पॅलेस्टाईन आणि इस्त्रायल यांच्यातील युद्धात पॅलेस्टाईनमधील नागरिकांचे मोठ्या संख्येने बळी जात आहेत. युद्धामुळे अनेकांची उपासमार होत आहे. महिला-मुलांचे महिला-मुलांचे प्रचंड हाल होत आहेत, जगात अशा प्रकारे कुणाचे बळी जातात, हाल होतात तेव्हा त्याचा निषेधच करायला हवा, याबद्दल प्रश्नच नाही. जगातील कुठलाही सहृदयी माणूस अशा घटनांचा निषेधच करेलच. भारताने पॅलेस्टाईन आणि इस्त्रायलचे युद्ध थांबावे आणि त्या भागात शांतता प्रस्थापित व्हावी, अशीच अपेक्षा व्यक्त केलेली आहे. रशिया आणि युक्रेन यांच्यातील युद्धामुळे युक्रेनचे अतोनात नुकसान झालेले आहे. इतकेच नव्हे तर हे मोठे देश असल्यामुळे त्यांच्यावर अवलंबून असलेल्या देशांच्या अर्थव्यवस्थांचे नुकसान होते. युद्धांमुळे खरे तर कुणाचाच फायदा होत नाही, तरीही देशांमध्ये युद्धे होतात, माणसांमध्ये संघर्ष होतात, हाणामाऱ्या होतात. त्याला काही कारणे असतात, ती देशांशी आणि व्यक्तींशी संबंधित असतात. अयातुल्ला खोमेनी यांची हत्या झाल्यानंतर भारतातील मुस्लिमांनी ठिकठिकाणी मोठे मोर्चे काढले. त्यामुळे अनेकांना त्याचे आश्चर्य वाटले. अनेकांच्या मनात हाच प्रश्न निर्माण झाला की, इराण हा एक वेगळा देश आहे. तिथल्या प्रमुख नेत्याचा मृत्यू झाला, तर इथला मुसलमानांनी आपल्यातील शिया सुन्नी असा भेद विसरून इतक्या मोठ्या संख्येने मोर्चे काढण्याचे काय कारण आहे? मोर्चामध्ये सहभागी झालेल्या काहींनी तर अतिशय तीव्र भावना व्यक्त केल्या. ते मुस्लीम धार्मिक नेते आहेत, त्यामुळे आम्ही त्यांच्याविषयी दुःख व्यक्त केले, अशी त्यांची भावना होती, पण हे करत असताना आपण भारतीय समाजापासून वेगळे उठून दिसत नाही ना याचा विचारही त्यांच्या मनात आला नाही.

२०१४ साली नरेंद्र मोदी पंतप्रधान होऊन भाजपची बहुमताची सत्ता केंद्रात आल्यापासून मुस्लीम समाजामध्ये बरीच नाराजी आहे, ती ते विविध प्रसंगी व्यक्त करत असतात. आपल्या सरकारने कितीही सुविधा दिल्यातरी विशिष्ट समाज आपल्याला मते देणार नाही, हे आता भाजप आणि मोदी यांनाही कळून चुकलेले आहे. त्यातून मग हिंदूंच्या मतांचे ध्रुवीकरण करून ती आपल्याकडे वळवण्यासाठी एक है तो सेफ है, अशा घोषणा भाजपच्या ज्येष्ठ नेत्यांकडून दिल्या जातात. जणूकाही मुस्लीम समाज हा इथला नागरिकच नाही. संपूर्ण देशाच्या एकतेसाठी अशी भावना निर्माण होणे हिताचे नाही. त्यामुळे समाज विभागला जातो. जेव्हा समाज विभागला जातो, तेव्हा देश विभागला जातो. त्याचा अनुभव भारतीयांनी १९४७ साली घेतलेला आहे. त्यामुळे भारतात राहताना आपल्याबद्दल इतर समाजामध्ये शंका निर्माण होणार नाही, याची आपण काळजी घ्यायला हवी. बरेच वेळा बाहेरच्या घटनेचे निमित्त असले तरी कारण आतले असते, आतली खदखद असते. त्यामुळे खामेनींच्या मृत्यूचे निमित्त असले तरी मुस्लिमांच्या मनात भाजपविरोधाची ही खदखद तर नाही ना, असाही प्रश्न उपस्थित होतो. कारण जेव्हा यापूर्वी भाजपने पाकिस्तानी आणि बांगलादेशी नागरिकांना परत पाठवण्याचा कायदा केला तेव्हा मुस्लिमांनी देशात विविध ठिकाणी शाहिन बाग आंदोलन चालवले. भारताची फाळणी झाल्यावर जे मुसलमान भारतात राहिले त्यांनी आम्ही इथे मिळून मिसळून राहू असे सांगितले होते. आता आपल्या भूमिकेमुळे इतरांच्या मनात शंका निर्माण होणार नाही याची त्यांनी काळजी घ्यायला हवी. कारण शक्तिप्रदर्शन हे एक दोन दिवसांसाठी जोश निर्माण करणारे असते, पण देश म्हणून एकत्र राहताना त्याचे दूरगामी दुष्परिणाम होत असतात.

**ह.भ.प. शिवाजी विठ्ठल चौगुले.**
**मु.पो.मासा बेलेवाडी,**
**कागल-कोल्हापूर**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

## रेल्वे प्रवाशांचा हा नाहक त्रास कधी थांबेल..?



**अक्षराज : शिवाजी चौगुले**

**दि.०७, मुंबई :** कल्याण जंक्शन रेल्वे स्टेशन नेहमी गर्दीने गजबजलेलं असतंत्यात प्लॅटफॉर्म क्रमांक सहा व सात वरील छत अनेक महिन्यापासून उघड्यावर आहे यापासून रेल्वे प्रवाशांना नाहक त्रास होत आहे. तरी रेल्वे प्रशासनाला कधी जाग येईल...?

# १ एप्रिल पासून तुमचे राशन कार्ड रद्द होणार ! पहा सरकारचे नवीन नियम...

**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.०६, ठाणे :** १ एप्रिल २०२६ पासून रेशन कार्डच्या नियमांत मोठे बदल होणार असून, अनेक अपात्र लाभार्थ्यांचे नाव रेशन कार्डमधून कट केले जाण्याची शक्यता आहे. नवीन नियमांनुसार पात्रता आणि निकष अधिक कडक करण्यात आले आहेत. या बदलांची सविस्तर माहिती खालीलप्रमाणे आहे:

**७० लाख अपात्र कार्ड धारकांवर टांगती तलवार...**

केंद्र आणि राज्य सरकारच्या माध्यमातून रेशन कार्ड धारकांसाठी नवीन नियमावली जाहीर करण्यात आली आहे. रेशन व्यवस्थेतील पारदर्शकता वाढवण्यासाठी आणि खऱ्या गरजूंनाच लाभ मिळवून देण्यासाठी हे पाऊल उचलण्यात आले आहे. ज्यांच्याकडे अटीपेक्षा जास्त संपत्ती किंवा उत्पन्न आहे, अशा व्यक्तींचे रेशन कार्ड आता रद्द केले जाणार आहे.

**पात्रतेचे नवीन निकष आणि मालमत्ता मर्यादा...**

नवीन नियमांनुसार, जर तुमच्याकडे खालीलपैकी कोणतीही गोष्ट असेल, तर तुम्ही रेशन कार्डसाठी अपात्र ठरू शकता. शहरी भागासाठी वार्षिक उत्पन्न ३ लाख रुपयांपेक्षा जास्त आणि ग्रामीण भागासाठी २ लाख रुपयांपेक्षा जास्त असल्यास रेशनचा लाभ मिळणार नाही.

ज्या कुटुंबांकडे चारचाकी वाहन (कार, ट्रॅक्टर इ.) आहे, त्यांचे रेशन कार्ड रद्द केले जाईल. तसेच जर तुमच्याकडे १०० चौरस मीटरपेक्षा जास्त क्षेत्रफळाचा प्लॉट, फ्लॅट किंवा स्वतःचे पक्के घर असेल, तर तुम्ही अपात्र ठराल. कुटुंबातील कोणताही सदस्य आयकर



भरत असेल किंवा शहरात ८० चौरस मीटरपेक्षा जास्त जागेवर व्यावसायिक गाळा असेल, तर रेशन कार्ड बंद होईल. त्याचबरोबर घरात वातानुकूलित यंत्र किंवा ५ किलोवॅटपेक्षा जास्त क्षमतेचे जनरेटर असल्यासही अपात्रतेची कारवाई होऊ शकते.

**चुकीची माहिती दिल्यास होणार दंडात्मक कारवाई...**

अनेक लोक आपली आर्थिक स्थिती लपवून रेशनचा लाभ घेत असल्याचे सरकारच्या निदर्शनास आले आहे. अशा लोकांसाठी सरकारने कडक इशारा दिला आहे. जर एखाद्या व्यक्तीने खोटी माहिती देऊन रेशन कार्ड काढले असेल, तर अशा कार्ड धारकांनी ते स्वतःहून प्रशासनाकडे जमा करावे.

तपासणी दरम्यान जर कोणी दोषी आढळले, तर केवळ त्याचे रेशन कार्ड रद्द होणार नाही, तर त्याने आतापर्यंत घेतलेल्या रेशनची बाजारभावाने वसुली केली जाईल आणि संबंधितावर कायदेशीर गुन्हाही दाखल केला जाऊ शकतो. रेशन कार्ड 'ई-केवायसी' करणे आता अनिवार्य झाले असून, ज्यांची केवायसी प्रक्रिया पूर्ण नाही, त्यांचे रेशन तात्पुरते बंद केले जात आहे.

## थोडक्यात

## चिमुकल्यांच्या कलाविष्कारास दाद !



**अक्षराज : राजकुमार इकडे**

**दि.०७, सुपा (अहिल्यानगर) :** पारनेर तालुक्यातील रांजणगाव येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा रांजणगाव या शाळेचे वार्षिक स्नेहसंमेलन विद्यार्थ्यांच्या कलाविष्काराने ग्रामस्थ भारावून गेले सुमधूर आणि नयनरम्य नृत्य ऐतिहासिक आणि विनोदी नाटके त्याला साजेसा अभिनय आणि दिलखेचक अदा सादर करीत विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या बहारदार सांस्कृतिक कार्यक्रमाने उपस्थित त्यांची मने जिंकले. पारनेरचे गटशिक्षणाधिकारी विस्ताराधिकारी व केंद्रप्रमुखांच्या मार्गदर्शनाखाली मुख्याध्यापक खंडेराव साबळे व उपाध्यापक संदीप पठारे व रुपाली गंधाडे तसेच अंगणवाडी सेविका चहाळ मॅडम, संगीता मॅडम तसेच युकेजी वर्गाच्या शिक्षिका मन्यार मॅडम यांनी स्नेहसंमेलनाचे आयोजन केले. तसेच रांजणगाव येथील शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष उपाध्यक्ष व सर्व सदस्य तसेच सरपंच व ग्रामपंचायत सदस्य यांनी शिक्षकांना भरघोस मदत केली. या कार्यक्रमानिमित्त सामाजिक कार्यकर्त्या प्रियंका शिंदे पाटील तसेच राणीताई यादव, प्राध्यापक शिंदे, सरपंच महेश देशमुख, उपसरपंच दादा शिंदे, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष प्राजक्ता चहाळ हे उपस्थित होते. यावेळी गावातील सर्व आजी-माजी सैनिक परिवार, तरुण मंडळाचे सदस्य, सर्व पालक व ग्रामस्थांनी स्नेहसंमेलनासाठी विशेष सहकार्य केले. अतिशय शिस्तबद्ध आयोजन आणि विद्यार्थ्यांच्या कलागुणांमुळे या स्नेहसंमेलनाचे पंचक्रोशी व रांजणगाव परिसरातील सर्व भागातून कौतुक होत आहे.

# त्यागमूर्ती स्व.सुशिलाबाई शंकरराव गाढवे !

आदरणीय बाईंचे आठवे पुण्यस्मरण...नुकतेच झाले...प्रथम त्यांना विनम्र अभिवादन...त्यांच्या आठवणींना उजाळा देताना त्यांच्या प्रेरणादायी व्यक्तिमत्त्वाबद्दल काही शब्द लिहावेसे वाटतात.

बाईंच्या विचारांची, संस्काराची, कार्याची, त्यांच्या स्त्री म्हणून अस्तित्वची व्यापकता एवढी श्रेष्ठ आहे कि बाई शब्दात न सामावणाऱ्या आहेत.... पण तरीही हा व्यक्त होण्याचा छोटासा प्रयत्न..

बाईंचा आणि माझा तसा फारसा समोरासमोर परिचय नव्हता. एक-दोन वेळाच काही कामानिमित्त औपचारिक भेट झाली होती. पण त्यांच्या विषयी खूप ऐकले होते. लोकांच्या मनात त्यांच्याबद्दल असलेला आदर, प्रेम, आत्मीयता आणि निष्ठा मी अनुभवली होती. एखाद्या व्यक्तीबद्दल लोक इतक्या आपुलकीने बोलतात, यावरूनच त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची महानता लक्षात येते.

हे कसे शक्य आहे... अशी माणसं आयुष्यात फार कमी पाहायला मिळतात. बाईंची राहणी अतिशय साधी होती, पण विचार मात्र अत्यंत उंच आणि व्यापक होते. त्या काळात शिक्षण घेणे ही मोठी गोष्ट होती, तरीही त्यांनी कधीच त्याचा गर्व केला नाही. नम्रता, साधेपणा आणि कष्टाची तयारी हीच त्यांची खरी ओळख होती. शैक्षणिक तसेच राजकीय क्षेत्रात त्यांनी केलेले कार्य उल्लेखनीय होते आणि अनेकांना त्यांनी प्रेरणा दिली.

अतिशय हलाखीच्या परिस्थितीतही बाईंनी कधी हार मानली नाही. अनेक अडचणी आणि संकटांना धैर्याने सामोरे जात त्यांनी कुटुंबातील सर्व जबाबदाऱ्या समर्थपणे पार पाडल्या. त्यांच्या कष्टामुळे आणि जिद्दीमुळे घर उभे राहिले आणि कुटुंब एकत्र राहिले. प्रेम, जिव्हाळा आणि संस्कार यांच्या बळावर त्यांनी संपूर्ण कुटुंब घट्ट बांधून ठेवले.

त्यांच्या येण्याने घरात जणू लक्ष्मीच्या पावलांनी सौख्य, समाधान आणि स्थैर्य निर्माण झाले असे सर्वजण



आजही प्रेमाने सांगतात.

आदरणीय सर शंकररावजी गाढवे आणि बाईंचे नाते पाहिले की ते जणू आधुनिक काळातील शंकर आणि पार्वती यांचे सुंदर उदाहरण वाटायचे. त्यांच्या नात्यात परस्पर आदर, विश्वास आणि साथ होती. जीवनातील प्रत्येक टप्प्यावर त्यांनी एकमेकांना साथ दिली आणि एकमेकांच्या कार्याला बळ दिले.

खरं तर बाई या स्त्री अर्धांगिनी असल्याचे एक उत्तम उदाहरण होत्या. अर्धांगिनी म्हणजे फक्त पत्नी नव्हे, तर जीवनाच्या प्रत्येक प्रवासात पतीच्या खांद्याला खांदा लावून उभी राहणारी सहचारिणी. बाईंनी हे आपल्या आयुष्यातून सिद्ध करून दाखवले.कुटुंब सांभाळताना, कठीण परिस्थितीत धैर्य देताना आणि समाजकार्यात पतीला साथ देताना त्यांनी आपल्या भूमिकेचे महत्त्व दाखवून दिले. त्यामुळे त्यांचे आयुष्य केवळ एका कुटुंबापुरते मर्यादित राहिले नाही, तर समाजासाठीही प्रेरणादायी ठरले.

त्याचबरोबर त्या स्त्रीशक्तीचेही एक उत्तम उदाहरण होत्या. संकटांना सामोरे जात आत्मविश्वासाने पुढे जाणे, कष्टाने यश मिळवणे आणि कुटुंब तसेच समाजासाठी योगदान देणे हे सर्व त्यांनी आपल्या आयुष्यातून दाखवून दिले. आज बाई आपल्या मध्ये नसल्या तरी त्यांचे विचार, त्यांचे संस्कार आणि त्यांनी दिलेली प्रेरणा कायम आपल्या सोबत राहणार आहे.

त्यांच्या पवित्र स्मृतीस
विनम्र अभिवादन...

**लेखन – प्रा.वर्षा योगेश गाढवे**
**संकलन– प्रा.अमीर इनामदार**

## निवृत्त पोलिसाने वकिलाला धमकावले

### पारनेर बार असोशिएशनकडून गुन्हा दाखल !



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०७, पारनेर (अहिल्यानगर) :** फिर्यादिचे वकिलपत्र घेतल्याच्या रागातुन जवळे, येथील निवृत्त पोलिस अधिकाऱ्याने पारनेर बारचे सदस्य असलेले वकील सोमनाथ गोपाळे यांना पारनेर न्यायालय परिसर आणि जवळे येथील कुकडी सहकारी पतसंस्थेच्या आवारात धमकावून गलिच्छ शिवीगाळ केल्याचा धक्कादायक प्रकार पारनेर तालुक्यात घडला आहे.

याबाबत धमकावणार्या आरोपी च्या विरुद्ध अँड. सोमनाथ गोपाळे यांनी पारनेर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. धमकावणारा आरोपी हा मुंबई पोलिस दलातील निवृत्त पोलिस अधिकारी आहे. या गंभीर घटनेची दखल घेवून पारनेर बार असोशिएशने बैठक बोलावली होती. अशा प्रकारांमुळे वकीलांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आल्याने, यावेळी या घटनेचा संघटनेकडून निषेध करण्यात आला. अँड. गोपाळे यांना धमकावणाऱ्या आरोपीला अटक करण्याची मागणी निवेदनाद्वारे पारनेर पोलिसांकडे केली आहे. पारनेर बारचे संघटनेचे अध्यक्ष मंगेश औटी यांचेकडून पारनेर पोलिस निरीक्षक संतोष खेडकर यांनी यावेळी निवेदन स्विकारून आरोपीविरुद्ध कडक कारवाई करण्याचे आश्वासन बारच्या शिष्टमंडळाला दिले आहे. यावेळी पारनेर बार संघटनेचे इतर सदस्य मोठ्या संखेने हजर होते.

## पनवेल मनपा तर्फे बचतगटांच्या वस्तुंचे विक्री व प्रदर्शन सुरू

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.०७, पनवेल :** जागतिक महिला दिनाच्या पार्श्वभूमीवरती पनवेल महानगरपालिकेच्यावतीने बचत गटांनी उत्पादित केलेल्या विविध वस्तुंचे विक्री व प्रदर्शनाचे उदघाट्न आज दिनांक ७ मार्च २०२६ रोजी उप महापौर प्रमिला पाटील यांच्या हस्ते आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहामध्ये करण्यात आले. यावेळी महापालिका सदस्य दर्शना भोईर, मोनिका महानगर, अतिरिक्त आयुक्त महेश कुमार मेघमाळे, उपायुक्त मंगला माळवे, सहायक आयुक्त डॉ.रूपाली माने, अधिक्षक कविता मोकल, डेएनयुएलएमचे व्यवस्थापक विनया म्हात्रे, नवनाथ थोरात उपस्थित होते. पनवेल महापालिका क्षेत्रातील महिलांना स्वावलंबी व सशक्त बनवण्यासाठी, व्यवसायिक व सामाजिक कौशल्य वाढविण्यासाठी पनवेल महानगरपालिकेमार्फत महापालिका कार्यक्षेत्रातील महिलांचे सक्षमीकरण करण्यासाठी महापौर नितिन पाटील व आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली बचत गटाने उत्पादित केलेल्या विविध वस्तुंचे विक्री व प्रदर्शन शनिवार, रविवार सोमवार तीन दिवस आयोजित करण्यात आले आहे. महापालिका कार्यक्षेत्रातील नागरिकांनी या मोठ्या संख्येने भेट द्यावी असे आवाहन महापालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

# महात्मा फुले कृषि विद्यापीठात जागतिक महिला दिन संपन्न

**अक्षराज : प्रमोद डफळ**

**दि.०७, राहुरी विद्यापीठ :** शेतीमध्ये महिलांची भागिदारी वाढत आहे. ग्रामीण भागातून शहरी भागाकडे स्थलांतराचे प्रमाण वाढल्यामुळे शेतीमध्ये कामे करण्यासाठी मजुरांची टंचाई भासत आहेत. अशा परिस्थितीत महिलांना महिलांची शेतीतील श्रम कमी करणार्या अद्ययावत तंत्रज्ञानाची जोड द्यावी लागणार आहे. यासाठी महिला साक्षर असण्याबरोबरच त्यांना इंटरनेटची सुविधा उपलब्ध करुन द्यावी लागेल. यामुळे स्मार्टफोनच्या मदतीने शेती करणे महिलांसाठी अधिक सुलभ होईल व त्या अधिक सक्षमपणे शेती करु शकतील. महिलांचे घरामध्ये अन्न तयार करण्याबरोबरच शेतामध्ये धान्याचे उत्पादन घेण्यामध्ये महत्वाचे योगदान असल्याचे प्रतिपादन चेन्नई येथील एम. एस. स्वामीनाथन रिसर्च फाउंडेशनच्या अध्यक्ष तथा नवी दिल्लीच्या भारतीय वैद्यकीय संशोधन परिषदेच्या महानिदेशक आणि जागतिक आरोग्य संघटनेच्या माजी मुख्य वैज्ञानिक व उपमहानिदेशक डॉ.सौम्या स्वामीनाथन यांनी केले.

आंतरराष्ट्रीय महिला शेतकरी वर्ष- २०२६ व जागतिक महिला दिन- २०२६ चे औचित्य साधून महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृहामध्ये जागतिक महिला दिनाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रमुख अतिथी म्हणुन ऑनलाईन मार्गदर्शन करतांना डॉ सौम्या स्वामीनाथन बोलत होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.विलास खर्चे होते. यावेळी प्रमुख पाहुण्या म्हणुन चेन्नई येथील एम.एस. स्वामीनाथन रिसर्च फाउंडेशनच्या वरिष्ठ फेलो डॉ. आर.व्ही. भवानी उपस्थित होत्या. याप्रसंगी विशेष अतिथी म्हणून छत्रपती संभाजीनगर व जालना जिल्ह्याच्या उपवनसंरक्षक सुवर्णा माने (भारतीय वनसेवा) व जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी, पुणे तथा कृषि व्यवसाय व्यवस्थापन व स्मार्ट प्रकल्पाच्या तज्ञ उज्वला बाणखिले उपस्थित होत्या. यावेळी व्यासपीठावर सुरुची खर्चे, विस्तार शिक्षण संचालक डॉ.गोरक्ष ससाणे, अधिष्ठाता डॉ.सातापा खरबडे, संशोधन संचालक डॉ.प्रशांत बोडके, पुणे येथील अटारीचे प्रमुख शास्त्रज्ञ डॉ.शाकीर अली, कृषि तंत्रज्ञानाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ.विजू अमोलिक,




कृषि अभियांत्रिकी महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ.सचिन नलावडे, नियंत्रक सदाशिव पाटील, उद्यानविद्या विभाग प्रमुख डॉ.बी.टी. पाटील व उपकुलसचिव प्रशासन विजय पाटील उपस्थित होते.

यावेळी डॉ.सौम्या स्वामीनाथन मार्गदर्शन करतांना पुढे म्हणाल्या की, डॉ.एम.एस. स्वामीनाथन यांच्या संकल्पनेनुसार आपण जीवन जगत असतांना पर्यावरणातील महत्वाचे घटक असलेल्या पशुपक्षी यांना सुरक्षीत ठेवून तसेच नैसर्गिक संसाधनांना धक्का न लावता सर्वांनी आनंदात जगणे शक्य आहे, ही संकल्पना म्हणजे बायोहॅपीनेस सेंटर होय. आपण पुढच्या पिढीसाठी हे जग अधिक सुंदर करुन जावूया असे यावेळी त्या म्हणाल्या. याप्रसंगी अध्यक्षीय मार्गदर्शन करतांना कुलगुरु डॉ. विलास खर्चे म्हणाले की, महिलांचे शेतीमध्ये मोठे योगदान आहे. विद्यापीठाने तयार केलेले एकात्मिक शेती पध्दतीचे मॉडेल शेतकरी प्रथम प्रकल्पाच्या माध्यमातून चिंचविहिरे, कणगर, तांभेरे, कानडगावच्या शेतकरी महिलांनी स्वतःच्या शेतात राबविण्याबरोबरच त्याच्या प्रचार व प्रसार केला त्याचा आम्हाला सार्थ अभिमान आहे. या महिलांनी स्वतःच्या शेतामध्ये या एकात्मिक शेती पध्दतीच्या मॉडेलचा वापर केल्यामुळे त्यांच्या गावाचे उत्पन्न १.५ कोटी हुन ३.५ कोटीपर्यंत वाढले. फुले समृध्द व्हिलेज यामध्ये हीच संकल्पना आपण १० जिल्ह्यातील निवडलेल्या १० गावांमध्ये राबविणार आहोत. एम.एस. स्वामीनाथन रिसर्च फाउंडेशनच्या सहकार्याने आपण देशातले पहिले बायोहॅपीनेस सेंटर आज सुरु केले आहे. यामुळे निसर्गातील जैव विविधतेचे संवर्धन होण्यास मदत हाऊन पारंपारिक वाणांचे जतन होईल.

याप्रसंगी डॉ.आर.व्ही. भवानी मार्गदर्शन करतांना म्हणाल्या की सन २०२३-२४ च्या अहवालानुसार महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात ८० टक्क्यापेक्षा जास्त महिला शेतीमध्ये कार्यरत आहेत. लवकरच महाराष्ट्र शासन शेतीमध्ये काम करणार्या महिलांसाठी जास्त अधिकार देणारी योजना कार्यान्वित करणार आहे. पर्यावरण व मानवी कल्याणासाठी डॉ.एम.एस. स्वामीनाथन रिसर्च फाउंडेशनने बायोहॅपीनेस सेंटर्स देशभरात सुरु करणार आहे. देशामध्ये या सेंटरची सुरुवात करणारे महात्मा फुले कृषि विद्यापीठ हे पहिले विद्यापीठ असल्याचे त्या म्हणाल्या. यावेळी सुवर्णा माने, उज्वला बानखेले व डॉ. शाकीर अली यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ.गोरक्ष ससाणे यांनी केले. यावेळी भारतीय कृषि अनुसंधान परिषदेच्या शेतकरी प्रथम प्रकल्पातील महिला शेतकरी यांचा मान्यवरांचे हस्ते सत्कार करण्यात आला. यामध्ये चिंचविहीरे, कणगर, तांभेरे आणि कानडगाव येथील निर्मला गाडे, सविता पवार, पल्लवी गाडे, सविता वरगुडे, संगीता गागरे, अनिता गागरे, ज्योती गागरे, सविता गागरे, मु.पो.शेडशळ, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर येथील वैशाली संकपाळ वशमशादबी पठाण यांचा यामध्ये समावेश होता. यावेळी विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील दहा जिल्ह्यांमधील दहा गावांमध्ये फुले समृद्ध व्हिलेज अभियानाचा शुभारंभ करण्यात आला तसेच नाशिक व जळगाव जिल्ह्यातील ३० गावांमध्ये फुले पोकरा (नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प) संजीवनी व्हिलेज अभियानाचा शुभारंभ करण्यात आला. तसेच याप्रसंगी विद्यापीठ कार्यक्षेत्रातील १७ कृषि विज्ञान केंद्रे आणि १० कृषि तंत्रज्ञान विद्यालय येथे फुले एकात्मिक शेती पध्दती मॉडेल मिशनचा शुभारंभ मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला मान्यवरांच्या हस्ते नैसर्गिक शेती संशोधन व प्रशिक्षण केंद्र येथे बायोहॅपीनेस सेंटरचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी नैसर्गिक शेती संशोधन व प्रशिक्षण केंद्र आणि निसर्ग प्रक्षेत्र, रोपवाटिका व उद्यानविद्या फळपिके थेट पीक प्रात्यक्षिक प्रक्षेत्र या ठिकाणी भेटी देण्यात आल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.आनंद चवई यांनी तर आभार डॉ.प्रशांत बोडके यांनी मानले. या कार्यक्रमास शास्त्रज्ञ, प्राध्यापक, अधिकारी, विद्यार्थी, विद्यार्थीनी, शेतकरी, महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आळंदी येथील जाहूरकर महाराज संस्था तात्काळ बंद करण्याचे आदेश



**अक्षराज : प्रतिनिधी**
**दि.०७, आळंदी (पुणे) :** आळंदी नगरपरिषद हद्दीतील प्रदक्षिणा रोड, आळंदी येथे असलेल्या जाहूरकर महाराज संस्था या ठिकाणी निवासी स्वरूपात राहणाऱ्या बालकांबाबत गंभीर तक्रारी प्राप्त झाल्यानंतर आळंदी नगरपरिषद प्रशासनाने तात्काळ कारवाई केली आहे.

दि.०६ मार्च २०२६ रोजी दैनिक ‘सकाळ’ मध्ये प्रसिद्ध झालेल्या वृत्तानुसार सदर संस्थेमध्ये अध्यात्मिक शिक्षण घेत असलेल्या १२ वर्षांच्या मुलीवर शारीरिक व मानसिक शोषण झाल्याची बाब समोर आली होती. या पार्श्वभूमीवर दि.७ मार्च २०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता मुख्याधिकारी माधव खांडेकर यांच्या नेतृत्वाखाली नगरपरिषद अधिकारी-कर्मचारी तसेच आळंदी दामिणी महिला पोलीस पथकाच्या उपस्थितीत संस्थेची प्रत्यक्ष पाहणी करण्यात आली.

सदर पाहणीदरम्यान महिला व बाल विकास विभागाचे शासन निर्णय दिनांक ०२ नोव्हेंबर २०१५ व ०३ जुलै २०२५ नुसार खाजगी वसतिगृहांसाठी लागू असलेल्या अनेक नियमांचे उल्लंघन झाल्याचे निदर्शनास आले. तपासणीदरम्यान सदर संस्थेकडे कोणत्याही शासन विभागाचा निवासी विद्यार्थ्यांना ठेवण्याचा वैध परवाना नसल्याचे देखील स्पष्ट झाले.

**संस्था अनधिकृत घोषित !**

वरील सर्व बाबींचा विचार करून तसेच महिला व बाल विकास विभागाच्या शासन निर्णयातील तरतुदींनुसार जाहूरकर महाराज संस्था ही अनधिकृत असल्याचे घोषित करण्यात येत असून बालकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने सदर संस्था तात्काळ बंद करण्याचे आदेश मुख्याधिकारी, आळंदी नगरपरिषद यांनी दिले आहेत.

**बालकांचे पुनर्वसन !**

सदर संस्थेमध्ये राहत असलेली ४३ मुले व ४ मुली यांना पुढील शासकीय/मान्यताप्राप्त बालगृहांमध्ये सुरक्षितरीत्या हलविण्यात आले आहे :

१. ज्ञानेश बालमंदिर, फुलगाव (मरकळ रोड)
२. ज्ञानमंदिर बालगृह, नारकरवाडी, ता. आंबेगाव, जि.पुणे
३. सह्याद्री बालगृह, पञ्कटीका, घोडेगाव रोड, मंचर, जि.पुणे

**पाहणीदरम्यान आढळलेल्या प्रमुख त्रुटी :**

- विद्यार्थ्यांच्या प्रवेशासाठी आवश्यक पालकांचे अर्ज व छाननी समिति उपलब्ध नव्हती.
- विद्यार्थ्यांचे प्रवेश अर्ज व आधारकार्ड नोंदी उपलब्ध नव्हत्या.
- संस्थेमध्ये नियमांनुसार कर्मचारी वर्ग (रखवालदार इ.) उपलब्ध नव्हता.
- अभ्यासिका व भोजन हॉल स्वतंत्र नसून एकाच हॉलमध्ये वापर होत असल्याचे आढळले.
- स्वयंपाकगृह व निवासासाठी आवश्यक जागा अपुरी होती.
- बालकांच्या संख्येनुसार पुरेशी स्नानगृहे व स्वच्छतागृहे उपलब्ध नव्हती तसेच ती हवेशीर नव्हती.
- विद्यार्थ्यांसाठी भोजनाचा निश्चित मेनू ठेवलेला नव्हता.
- विद्यार्थ्यांनी दिलेल्या माहितीनुसार रात्रीचे उरलेले अन्न सकाळी दिले जात असल्याचे आढळले.
- विद्यार्थ्यांच्या येण्या-जाण्याची नोंद ठेवण्यासाठी गेट रजिस्टर उपलब्ध नव्हते.
- प्रथमोपचार पेटी उपलब्ध नव्हती, तसेच अत्यावश्यक सेवांचे क्रमांक दर्शविणारे फलक नव्हते.
- तक्रार पेटी उपलब्ध नव्हती.
- संस्थेचे नियम व अटी दर्शविणारे कोणतेही फलक लावलेले नव्हते.

**कारवाईवेळी उपस्थित अधिकारी / कर्मचारी :**

- सीमा चारभे – कर व प्रशासकीय सेवा, आळंदी नगरपरिषद
- प्रदीप आवारी – लेखापरीक्षक, आळंदी नगरपरिषद
- वैशाली पाटील – सहा. प्रकल्प अधिकारी, आळंदी नगरपरिषद
- मिथिल पाटील – CLTC अभियंता, आळंदी नगरपरिषद
- पूजा श्रीहरी नाईक – म.पो.शी २८५७, आळंदी दामिणी पथक
- श्वेता विलास शेलकर – म.पो.शी २९६२, आळंदी दामिणी पथक
- अर्जुन घोडे – समुदाय संघटक, आळंदी नगरपरिषद
- शत्रुघ्न रुस्तुम खोकले – बाल संरक्षण अधिकारी (संस्थात्मक), जिल्हा बाल संरक्षण कक्ष, पुणे
- माधव खांडेकर – मुख्याधिकारी, आळंदी नगरपरिषद
- भीमा नरके- पोलीस निरीक्षक आळंदी पोलीस स्टेशन
- तसेच मच्छिंद्र शेंडे आळंदी पोलीस स्टेशन

# थोडक्यात

## धागेदोरे नसतानाही बेवारस महिलेच्या खुनाचा उलगडा आरोपी जेरबंद



**अक्षराज : प्रतिनिधी**
**दि.०७, पुणे :** कोणतेही ठोस धागेदोरे किंवा तांत्रिक पुरावे नसतानाही गुन्हे शाखेच्या पथकाने अवघ्या काही दिवसांत बेवारस महिलेच्या खुनाचा उलगडा करत आरोपीला अटक केली आहे. हडपसर-सासवड रोडलगत दिवे घाटाच्या पायथ्याशी वडकी येथे ३ मार्च २०२६ रोजी एका ३० ते ४० वर्षे वयोगटातील अनोळखी महिलेचा अर्धनग्न अवस्थेतील मृतदेह आढळून आला होता. या घटनेमुळे परिसरात मोठी खळबळ उडाली होती.

फुरसुंगी पोलीस ठाण्यात या प्रकरणी खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्यानंतर गुन्हे शाखा युनिट-६ च्या पथकाने वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली तपासाची सूत्रे हाती घेतली. सुरुवातीला मृत महिलेची ओळख पटत नसल्याने तपासाला अनेक अडचणी येत होत्या. मात्र पोलीस निरीक्षक सुदर्शन गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासणे, स्थानिकांकडून माहिती गोळा करणे आणि घटनास्थळाचा बारकाईने अभ्यास करणे अशी बहुआयामी तपासमोहीम राबवली.

या तपासादरम्यान एका संशयित हालचालीचे सीसीटीव्ही फुटेज पोलिसांच्या हाती लागले. त्या आधारे पोलिसांनी प्रकाश बिभीषण माने (वय २९, रा. वडकी नाला, ता. हवेली, जि. पुणे) याला ताब्यात घेतले. सखोल चौकशीदरम्यान आरोपीने गुन्ह्याची कबुली दिली. आरोपीने मयत महिलेसोबत जबरदस्तीने शारीरिक संबंध प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला. मात्र महिलेने तीव्र प्रतिकार केल्याने संतप्त झालेल्या आरोपीने तिचा गळा दाबून तसेच डोक्यात दगड मारून खून केल्याचे उघड झाले.

या प्रकरणाचा उलगडा मा. पोलीस आयुक्त अमितेश कुमार, मा. पोलीस सहआयुक्त रंजनकुमार शर्मा, मा. अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) पंकज देशमुख, मा. पोलीस उपआयुक्त (गुन्हे) निखिल पिंगळे आणि मा. सहायक पोलीस आयुक्त राजेंद्र मुळीक यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आला.

पोलीस निरीक्षक सुदर्शन गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली तानाजी देशमुख, प्रमोद टिळेकर, प्रशांत कर्णवर, बाळासाहेब सकटे, अमित कांबळे, गणेश माने, शेखर काटे, नानासाहेब मोरे, अनिल जामगे तसेच महिला पोलीस अंमलदार पल्लवी मोरे यांच्या पथकाने ही कारवाई यशस्वीरीत्या पार पाडली.

# पाटण नगरपंचायत विकासकामांसाठी मुख्यमंत्र्यांकडे निधीची मागणी



**अक्षराज : सुरेश संकपाळ**
**दि.०७, पाटण :** पाटण शहरातील घनकचरा प्रकल्प व पाणीपुरवठा योजनेसह विविध विकास कामांसाठी निधींच्या मागण्यांचे निवेदन भारतीय जनता पक्षाचे राज्य परिषद सदस्य सत्यजितसिंह पाटणकर यांच्या वतीने भाजपा जिल्हा सरचिटणीस याज्ञसेन पाटणकर यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे दिले.

यावेळी भाजपा प्रदेशाध्यक्ष व माजी मंत्री आ.रविंद्र चव्हाण, मंत्री चंद्रकांत पाटील, राज्यसभा उमेदवार माजी मंत्री विनोद तावडे आदी मान्यवर उपस्थित होते.

पाटण शहरासाठी सत्यजितसिंह पाटणकर यांनी मागणी केल्यानुसार प्रामुख्याने घनकचरा व्यवस्थापन व चोवीस बाय सात पाणीपुरवठा योजनेसाठी निधी मंजूर करणेबाबत मुख्यमंत्र्यांना विनंती केली आहे. पाटण शहर हे तालुक्याचे ठिकाण असुन सन २०१६ साली तालुक्याचे ठिकाण म्हणून पाटण ग्रामपंचायतीचे नगरपंचायतीत रूपांतर करण्यात आले. परंतु नगरपंचायतीच्या विविध करांमधुन येणारे उत्पन्न अत्यल्प असल्याने घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत कामे करण्यास हा निधी अपुरा पडत आहे.

याशिवाय पाटण नगरपंचायत हद्दीचा विचार करता नगरपंचायतीस केंद्रीय वित्त आयोगातुन मिळणारा निधीही अपुरा पडत असल्याने घनकचरा व्यवस्थापनाची कामे करता येत नाहीत. घनकचरा व्यवस्थापनामध्ये दररोज घरोघरी जाऊन कचरा गोळा करणे, कच-याची विल्हेवाट लावणे, गटर साफ करणे, स्वच्छता आदी कामांचा समावेश आहे. यामुळे नगरपंचायत हद्दीतील घनकचरा व्यवस्थापनातंर्गत कामांसाठी आपल्याकडून खास बाब म्हणून २ कोटी रूपये निधी मंजुर करण्यात यावा. याशिवाय पाटण शहरास केंद्र शासन पुरस्कृत अमृत २.० योजनेंतर्गत नळ पाणीपुरवठा योजनेसाठी १९.७० कोटी रूपये मंजुर झाले असुन ही योजना सुरू करणेकरीता नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेचा स्वहिस्सा म्हणून प्रकल्प किंमतीच्या ०.५ टक्के भरणे आवश्यक आहे. नगरपंचायतीची आर्थिक परिस्थिती कमकुवत असल्याने १ कोटी रुपये रक्कम ते भरू शकत नाहीत. नगरपंचायतींना वैशिष्टयपूर्ण कामासाठी विशेष अनुदान योजनेंतर्गत आपल्याकडून १ कोटी रुपये निधी शहराचा पाणीपुरवठा प्रकल्पामधील नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेचा स्वहिस्सा भरणेकरीता मंजुर करून सहकार्य करावे अशा मागण्या सत्यजितसिंह पाटणकर यांनी या निवेदनांद्वारे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे या निवेदनाद्वारे केल्या आहेत.

## ACB नांदेडचा राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेत दमदार ठसा

### टेबल टेनिस व बॅडमिंटनमध्ये अव्वल यश...




**अक्षराज : प्रतिनिधी**
**दि.०७, सांगली :** २ री अखिल भारतीय पोलीस बॅडमिंटन व टेबल टेनिस क्लस्टर स्पर्धा २०२५-२०२६ साठीची निवड चाचणी सांगली येथे पार पडली. या राज्यस्तरीय स्पर्धेत ACB नांदेडच्या अधिकाऱ्यांनी व कर्मचाऱ्यांनी उत्कृष्ट कामगिरी करत विभागाचा मान उंचावला आहे.

या स्पर्धेत अप्पर पोलीस अधीक्षक अशोक कदम (ACB नांदेड) यांनी GO टेबल टेनिस ५०+ गटात प्रथम क्रमांक पटकावून उल्लेखनीय कामगिरी केली. तसेच पोलीस निरीक्षक विशाल बहात्तरे (ACB नांदेड) यांनी NGO टेबल टेनिस ४०+ गटात प्रथम क्रमांक मिळवित अव्वल स्थान मिळवले.

याशिवाय पोलीस हवालदार संतोष पुलगमवार (बक्कल क्र. ५९८, ACB नांदेड) यांनी NGO बॅडमिंटन ४०+ गटात द्वितीय क्रमांक मिळवून उल्लेखनीय यश संपादन केले.

ACB नांदेडच्या अधिकाऱ्यांनी राज्यस्तरीय स्पर्धेत मिळवलेल्या या यशाबद्दल पोलीस दलातून त्यांचे कौतुक होत असून त्यांच्या पुढील अखिल भारतीय स्पर्धेसाठी शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

# टाकळी ढोकेश्वर येथिल आदर्श ग्रामीण महिला मंडळ संस्थेला,

## राज्य महिला आयोगाचा राज्यस्तरीय पुरस्कार प्रदान...




**अक्षराज : वसंत रांधवण**
**दि.०७, पारनेर (अहिल्यानगर) :** महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या वतीने आयोजीत जागतिक महिला दिनानिमित्त महिलांच्या सक्षमीकरणासाठी आणि कल्याणासाठी उल्लेखनीय कार्य करणाऱ्या राज्यातील विविध जिल्ह्यांमधील व्यक्ती व संस्थांचा शनिवारी दि. ८ मार्च रोजी राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. मुंबईतील रविंद्र नाट्य मंदिर, प्रभादेवी येथे हा पुरस्कार सोहळा नुकताच संपन्न झाला.

यावेळी अहिल्यानगर जिल्ह्यातील पारनेर तालुक्यातील टाकळी ढोकेश्वर येथिल आदर्श ग्रामीण महिला मंडळ संस्थेच्या अध्यक्षा मंगल रावसाहेब झावरे यांच्या वतीने संचालक रावसाहेब झावरे यांना राज्यस्तरीय महिला गौरव पुरस्कार सन्मानपूर्वक प्रदान करण्यात आला. यावेळी राज्याचे उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर, मंत्री, तथा महिला व बालविकास विभागाच्या आदिती तटकरे, राज्यमंत्री, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण पाणीपुरवठा व आरोग्य उर्जा, महिला बालविकास सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मेघना बोर्डीकर यांच्या हस्ते पुरस्कार वितरण झाले. त्याचप्रमाणे राज्यातून विविध व्यक्त व संस्थेचे पदाधिकारी व पुरस्कार्थी उपस्थित होते.

आदर्श ग्रामीण महिला मंडळ संस्थेने अहिल्यानगर जिल्ह्यात महिलाविषयक प्रश्नांवर केलेल्या सातत्यपूर्ण आणि प्रत्यक्ष प्रभावी अंमलबजावणी तसेच दिव्यांग मुलांच्या विकासासाठी, विशेषतः मतिमंद मुलांच्या निवासी शाळेच्या माध्यमातून शिक्षण आणि पुनर्वसनात व दिव्यांग कल्याण विभागाच्या अंतर्गत मुलांच्या विकासासाठी राज्य शासनाच्या माध्यमातून जिल्ह्यात सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. आदर्श ग्रामीण महिला मंडळ हे टाकळी ढोकेश्वर मधील महत्वपूर्ण सामाजिक संस्थांपैकी एक असल्याने त्यांच्या कार्याची दखल घेऊन राज्य महिला आयोगाच्या वतीने यंदाच्या राज्यस्तरीय महिला गौरव पुरस्काराने गौरविण्यात आले. पुरस्कार मिळाल्याबद्दल टाकळी ढोकेश्वर परिसरासह जिल्ह्यातील विविध संस्थांच्या वतीने अभिनंदन केले आहे.

# प्लाझ्मा शाळेतील स्काऊट प्रसिक पाटील ठरला...

## यावर्षीच्या ‘बेस्ट स्काऊट ऑफ दी ईयर २०२६ पुरस्कार’चा मानकरी

**अक्षराज : दिवाकर घेर**
**दि.०७, नागपूर :** खापरखेडा येथील प्लाझ्मा स्कूल आणि कनिष्ठ विद्यालयाचा यंदाचा ’बेस्ट स्काऊट ऑफ दी ईयर २०२६’ पुरस्कारचा मानकरी शाळेतील स्काऊट प्रसिक शैलेश पाटील ठरला आहे. फेब्रुवारी महिन्यात झालेल्या शाळेच्या वार्षिक कार्यक्रमात उपस्थित पाहुण्यांच्या हस्ते प्रसिक पाटील याला स्मृती चिन्ह आणि प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

या वर्षीच्या शैक्षणिक सत्रापासून स्काउट्स आणि गाईड्स या विषयात विविध परीक्षा, शिबिरे, उपक्रम, सेवा प्रकल्पां मध्ये सर्वात जास्त सहभाग घेणाऱ्या शाळेतील पात्र एक स्काऊट आणि एक गाईड यांना ‘बेस्ट स्काऊट/गाईड ऑफ दी ईयर’ हा पुरस्कार दिला जाणार आहे. प्रसिक पाटील याने सुरवाती पासूनच स्काउट्स आणि गाईड्स अंतर्गत शाळा व ओपन ग्रुप द्वारे आयोजित प्रवेश परीक्षा, प्रथम सोपान परीक्षा, द्वितीय सोपान परीक्षा, तृतीय सोपान परीक्षा सहित विविध शिबिरे, उपक्रम आणि सेवा प्रकल्पांमध्ये सर्वात जास्त सहभाग घेऊन उत्कृष्ट प्रदर्शन केले.

स्काऊट मास्टर शेखर कोलते यांच्या मार्गदर्शनात प्रसिकने राज्य पुरस्कार परीक्षा उत्तीर्ण केली असून आता राष्ट्रपती पुरस्कार परीक्षेची तयारी करीत आहे. सोबतच त्याने राज्य स्तर, राष्ट्रीय स्तर आणि आंतरराष्ट्रीय शिबिरांमध्ये सुद्धा सहभाग घेतला आहे. प्रसिकने या पुरस्कार स्वरूप यशप्राप्तीचे सर्व श्रेय आपले वडील शैलेश पाटील आणि आई सुलोचना पाटील यांना दिले आहे.

प्रसिक पाटीलला या पुरस्कार प्राप्तीसाठी शाळा अध्यक्ष पृथ्वीराज बोरकर, सचिव राजेश देशभ्रतार, शाळा प्रशासन प्रतिनिधी रश्मी बोरकर, शाळेतील मुख्याध्यापिका ए. के. मॅथ्यू,





उप मुख्याध्यापिका तनुश्री भट्टाचार्य, मुख्य अतिथी पत्रकार अमरचंद जैन, पत्रकार सुनील जालंधर, सामाजिक कार्यकर्ता बबलू सिंग ठाकूर, सर्व शिक्षक वर्ग आणि पालकवर्ग यांनी अभिनंदन करीत शुभेच्छा दिल्या.

## थोडक्यात

## चंद्रपूरात ८ मार्चला विदर्भस्तरीय आमदार श्री बॉडीबिल्डिंग स्पर्धा

### मुंबईचे सुप्रसिद्ध बॉडीबिल्डर हरमीत सिंह यांचे विशेष आकर्षण



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०७, चंद्रपूर :** आमदार किशोर जोरगेवार यांच्या संकल्पनेतून आणि श्री माता महाकाली क्रीडा महोत्सव २०२६ अंतर्गत चंद्रपूर येथे विदर्भस्तरीय आमदार श्री बॉडीबिल्डिंग स्पर्धा २०२६ चे आयोजन करण्यात आले आहे. ही स्पर्धा रविवार, ०८ मार्च २०२६ रोजी सायंकाळी ५ वाजता म नपा पटांगण गांधी चौक येथे पार पडणार आहे. या स्पर्धे त विदर्भातील विविध जिल्ह्यांतील नामांकित बॉडीबिल्डर्स सहभागी होणार असून, या उपक्रमामुळे चंद्रपूर जिल्ह्यातील क्रीडा क्षेत्राला नवी उभारी मिळणार असल्याचे आयोजकांनी सांगितले. स्पर्धेचे आयोजन चंद्रपूर बॉडीबिल्डर्स अँड फिटनेस असोसिएशन यांच्या वतीने करण्यात आले आहे. स्पर्धेचे विशेष आकर्षण म्हणजे मुंबईचे सुप्रसिद्ध बॉडीबिल्डर हरमीत सिंह यांची उपस्थिती राहणार आहे. त्यांच्या उपस्थितीमुळे स्पर्धेला अधिक रंगत येणार असल्याचे आयोजकांनी सांगितले. स्पर्धेसाठी आकर्षक रोख पारितोषिकांचीही घोषणा करण्यात आली आहे. त्यामध्ये आमदार श्री किताबासाठी ५१ हजार रुपये व ट्रॉफी, बेस्ट पोझर ३१ हजार रुपये व ट्रॉफी, तर बेस्ट इम्प्रुव्हमेंटसाठी २१ हजार रुपये व ट्रॉफी देण्यात येणार आहे. याशिवाय ग्रुप स्टेजमधील एकूण रोख पारितोषिके २ लाख ५१ हजार रुपयांची असणार आहेत. विदर्भातील नामांकित खेळाडू या स्पर्धेत सहभागी होणार असल्याने ही स्पर्धा क्रीडाप्रेमींसाठी आकर्षणाचे केंद्र ठरणार आहे. नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून खेळाडूंना प्रोत्साहन द्यावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## छत्रपती शिवाजी महाराज राजस्व अभियान संपन्न



**अक्षराज : शिवराज मुगळे**

**दि.०७, सोलापूर :** महाराष्ट्र शासन महसूल विभागाच्या वतीने बोरामणी तालुका दक्षिण सोलापूर येथे आयोजित छत्रपती शिवाजी महाराज राजस्व अभियान समाधान शिबिराचा शेकडो नागरिकांनी एकाच दिवसात लाभ देण्यात आला. सदर अभियानाचे उद्घाटन बोराम णी जिल्हा परिषद गटाचे नवनिर्वाचित सदस्य नेताजी खंडाळे, बोरामणी पंचायत समिती सदस्य विजय उमाकांत राठोड यांचे हस्ते शिवप्रतिमेचे पूजन करून करण्यात आले. यावेळी बोरामणी सरपंच, ग्रामपंचायत सदस्य, विविध शासकीय विभागांचे अधिकारी तसेच मोठ्या संख्येने बोरामणी परिसरातील नागरिक उपस्थित होते. तहसील कार्यालय दक्षिण सोलापूर यांचे वतीने आयोजित सदरहू शिबिरात ७/१२ दुरुस्ती, फेरफार नोंदी निर्गत करणे, विद्यार्थी दाखले, विविध प्रमाणपत्रे, निराधार योजना, घरकुल बांधकामासाठी वाळू पावती वाटप, नवीन बिनशेती सुधारणा, डिजिटल ७/१२ व खातेउतारा वाटप इत्यादी अनेक कामे महसूल विभागाच्या वतीने शेकडो नागरिकांना यावेळी उपलब्ध करून देण्यात आल्या.तसेच यावेळी पशुसंवर्धन विभाग, कृषि विभाग, पोलीस विभाग, महावितरणचे व महापारेषण विभाग, ग्राम विकास विभाग तसेच आरोग्य विभाग इत्यादी शासकीय विभागाचे अधिकारी व कर्मचारी यांनी शिबिरात सहभागी लोकांना विविध सेवा उपलब्ध करून देण्यात आल्या. तसेच विविध शासकीय योजनांची माहिती नागरिकांना देण्यात आली. प्रांताधिकारी सुमित शिंदे यांनी सदरहु शिबिरास भेट दिली.

## बल्लारशाह रेल्वे स्थानकाच्या परिसरात अनोळखी व्यक्तीचा मृतदेह आढळला

### हत्या की आत्महत्या तपास सुरु




**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०७, बल्लारपूर (चंद्रपूर) :** बल्लारपूर येथील रेल्वे स्थानक परिसरात एका अनोळखी तरुणाचा मृतदेह आढळून आल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. या प्रकरणी रेल्वे पोलीस चौकी बल्हारशाह येथे मर्ग क्रमांक ०७/२०२६, कलम १९४ भारतीय नागरी सुरक्षा संहिता अंतर्गत नोंद करण्यात आली असून मृत व्यक्तीची ओळख पटविण्याचे प्रयत्न सुरू आहेत. या संदर्भात मिळालेल्या माहितीनुसार, शनिवार दि. ७ मार्च २०२६ रोजी सकाळी सुमारे ७ ते ७.३० वाजताच्या सुमारास बल्हारशाह रेल्वे स्थानकाच्या काजीपेठ बाजूकडे किमी क्रमांक ८९०/३५ जवळ अंदाजे ३० ते ३५ वर्षे वयोगटातील एका अनोळखी इसमाचा मृतदेह मानेपासून धड वेगळ्या अवस्थेत पडलेला आढळून आला.

घटनेची माहिती मिळताच रेल्वे पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा करून मृतदेह ताब्यात घेतला. मृतकाची उंची अंदाजे ५.५ फूट असून वय अंदाजे ३० ते ३५ वर्षे आहे. रंग सावळा, चेहरा लांबट व दाढी-मिशी वाढलेली, बांधा मध्यम, डोक्यावरील केस काळे व वाढलेले आहेत. नाक सरळ व थोडे चपटे आहे. उजव्या हाताच्या मनगटावर इंग्रजीत जेपी असे गोंदलेले आहे. अंगावर जांभळ्या रंगाचा पूर्ण बाहींचा टी-शर्ट व निळ्या रंगाचा लोअर पॅन्ट घातलेला आहे.

सदर मृत इसमाची ओळख अद्याप पटलेली नसून त्याचा मृतदेह पुढील कार्यवाहीसाठी ग्रामीण रुग्णालय, बल्लारपूर येथील शवगृहात ठेवण्यात आला आहे. दरम्यान, या अनोळखी मृत इसमाची ओळख कोणास पटत असल्यास किंवा त्याचे नाव, गाव, पत्ता तसेच वारस किंवा नातेवाईकांविषयी माहिती असल्यास रेल्वे पोलीस स्टेशन वर्धा (मो. ७४९९९६७९५७) किंवा तपासी अंमलदार पोलीस हवालदार प्रवीण वन्हेकर (मो. ९८२३४००२३१) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन रेल्वे पोलिसांनी केले आहे. सदर तरुणाने आत्महत्या केली आहे की त्याची हत्या करून मृतदेह रेल्वे रुळांवर टाकण्यात आला, याबाबत विविध शक्यता तपासून पाहिल्या जात असून रेल्वे पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे.

## बदलापूर येथील बीजांड बेकायदेशीर विक्री प्रकरण गंभीर; दोषींवर कठोर कारवाई - राज्यमंत्री कदम

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.०७, मुंबई :** ठाणे जिल्ह्यातील बदलापूर येथे आर्थिक दृष्ट्या दुर्बल महिलांना पैशांचे आमिष दाखवून त्यांच्या गर्भाशयातील बीजांड काढून त्यांची बेकायदेशीर विक्री केल्याचे प्रकार उघड झाल्याबाबत विधान परिषदेत लक्षवेधी सूचनेद्वारे चर्चा झाली. ही लक्षवेधी सूचना आमदार चित्रा वाघ यांनी मांडली होती.

या लक्षवेधीला उत्तर देताना गृह (शहरे) विभागाचे राज्यमंत्री योगेश कदम यांनी सांगितले की, हा विषय अत्यंत गंभीर असून या प्रकरणात काही आयव्हीएफ सेंटरवर कारवाई करण्यात आली आहे. ठाण्यातील एका घरावर वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत छापा टाकण्यात आला असता तेथे कोणतेही अधिकृत आयव्हीएफ केंद्र नसल्याचे आढळून आले. नाशिकमधील एका नोंदणीकृत केंद्राशी संबंधित डॉक्टरांच्या माध्यमातून हे रॅकेट चालवले जात असल्याचे तपासात समोर आले आहे. या प्रकरणात सुमारे दहा महिला पीडित असल्याची माहितीही त्यांनी दिली.

सरोगसी कायदा २०२१ अंतर्गत महाराष्ट्र शासनाने २०२२ मध्ये राज्य मंडळाची स्थापना केली असून त्यामार्फत परिमंडळ स्तरावर समित्या नेमण्यात आल्या आहेत. या समित्यांमार्फत आयव्हीएफ केंद्रांची तपासणी केली जाते. मात्र या प्रकरणात एकाच महिलेची वारंवार नोंदणी करून वेगवेगळ्या महिलांच्या नावाने बीजांड काढण्यात आल्याचे समोर आले. यासाठी खोट्या आधार कार्डचा वापर करण्यात आला होता, असेही त्यांनी स्पष्ट केले.

राज्यात सुमारे ८६० आयव्हीएफ केंद्रे असून या घटनेच्या पार्श्वभूमीवर गृह विभाग आणि आरोग्य विभाग यांच्या संयुक्त तपासणीद्वारे या केंद्रांची माहिती गोळा करून गैरप्रकार होत असल्यास कठोर कारवाई केली जाईल, असेही कदम यांनी सांगितले. या प्रकरणातील संबंधित डॉक्टरांना अटक करण्यात आली आहे.

पूरक प्रश्नांना उत्तर देताना राज्यमंत्री योगेश कदम यांनी सांगितले की, या प्रकरणात करण्यात आलेली सोनोग्राफी अनधिकृत होती आणि संबंधित सोनोग्राफी केंद्रावरही कारवाई करण्यात आली आहे. तसेच नाशिकमधील नोंदणीकृत आयव्हीएफ केंद्रातून औषधे मिळवून त्यांचा गैरवापर झाल्याचेही निदर्शनास आले आहे.

आयव्हीएफ केंद्रांना मान्यता देताना तज्ज्ञ समित्या नियमितपणे आणि रँडम तपासण्या करत असतात. त्यामुळे स्वतंत्र समिती नेमण्याची आवश्यकता नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले. मात्र भविष्यात अशा प्रकारांना आळा घालण्यासाठी आवश्यक असल्यास बायोमेट्रिक पडताळणीची व्यवस्था करण्याचाही विचार करता येईल, असेही त्यांनी सांगितले. यावेळी आमदार चित्रा वाघ यांनी अशा प्रकारच्या रॅकेटवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली. त्यावर उत्तर देताना आवश्यक असल्यास अशा गुन्ह्यांवर मकोका सारख्या कडक कायद्यांतर्गत कारवाई करण्याचाही विचार केला जाऊ शकतो, असेही राज्यमंत्री योगेश कदम यांनी स्पष्ट केले.

## मुद्रित माध्यमांची विश्वासार्हता व महत्त्व अबाधित - पालकमंत्री डॉ.विखे पाटील

### राज्य अधिस्वीकृती समितीच्या बैठकीचे पालकमंत्र्यांच्या हस्ते उदघाटन

**अक्षराज : प्रमोद डफळ**

**दि.०७, शिर्डी (अहिल्यानगर) :** मुद्रित म ाध्यमांची विश्वासार्हता व महत्त्व आजही अबाधित असून, शासन मुद्रित माध्यमांतील वृत्तांची नेहमीच अतिशय गांभीर्याने दखल घेते. २० ते २५ वर्षे सेवा देऊनही उपेक्षित राहिलेल्या, नोकरीचे स्थैर्य नसलेल्या जिल्हा व ग्रामीण पातळीवरील पत्रकारांना अधिस्वीकृती समितीच्या माध्यमातून निश्चित न्याय मि ळेल, असा विश्वास राज्याचे जलसंपदा तथा जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ.राधाकृष्ण विखे पाटील यांनी व्यक्त केला.




महाराष्ट्र राज्य वृत्तपत्र व प्रसार माध्यम अधिस्वीकृती समितीच्या दोन दिवसीय राज्यस्तरीय बैठकीचा शुभारंभ आज शिर्डी येथे जलसंपदामंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ.राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हस्ते झाला. त्यावेळी ते बोलत होते. या बैठकीस राज्य अधिस्वीकृती समितीचे अध्यक्ष यदु जोशी, माहिती संचालक तथा समितीचे सदस्य सचिव डॉ.गणेश मुळे, शिर्डी श्री साईबाबा संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर, अपर जिल्हाधिकारी बाळासाहेब कोळेकर, उपविभागीय पोलीस अधिकारी अमोल भारती, समि ती सदस्य नाशिक विभागाचे माहिती उपसंचालक डॉ. किरण मोघे आदी उपस्थित होते.डॉ. विखे पाटील म्हणाले, सध्याच्या बदलत्या प्रवाहात सोशल मीडिया व डिजिटल माध्यमांचा प्रभाव मोठ्या प्रमाणावर वाढत आहे; तरीही मुद्रित माध्यमांचे महत्त्व अजिबात कमी झालेले नाही. पत्रकारांच्या न्याय्य हक्कासाठी अधिस्वीकृती समिती करत असलेल्या प्रयत्नाचे त्यांनी विशेष कौतुक केले. पत्रकारांचे निवृत्तीवेतन, त्यांचे स्थैर्य आणि त्यांच्यावरील व्यावसायिक दबाव यांसारख्या अत्यंत कळीच्या प्रश्नांवर समितीच्या शिफारशींनुसार शासन निश्चितच सकारात्मक पावले उचलेल, अशी ग्वाही देत त्यांनी समितीच्या कामकाजासाठी शुभेच्छा दिल्या.

राज्य अधिस्वीकृती समितीचे अध्यक्ष यदु जोशी यांनी आपल्या मनोगतात विखे कुटुंबीयांच्या राजकीय व संस्थात्मक कार्याचा गौरव केला. या आदर्श कार्यपद्धतीवर आधारित मार्गदर्शक 'संदर्भ ग्रंथ' तयार व्हावा, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. समितीच्या कामकाजाबाबत माहिती देतांना ते म्हणाले, राज्यभरातील सुमारे सव्वातीन हजार पत्रकारांना अधिस्वीकृती पत्रिका देण्याची कार्यवाही समितीमार्फत केली जाते. तथापि, समितीचे काम केवळ पत्रिका मंजुरीपुरते मर्यादित नसून, विविध वृत्तवाहिन्या, वृत्तपत्रे व पत्रकार संघटनांच्या प्रतिनिधींच्या माध्यमातून 'पत्रकारांचे कल्याण साध्य करणे' हे समितीचे प्रमुख ध्येय आहे. पत्रकारांच्या हितासाठी शासनाकडे योग्य शिफारशी करून त्याचा पाठपुरावा करण्यासाठी भविष्यातही सर्वांचे सहकार्य लाभेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. श्री.गाडीलकर यांनी यावेळी साईबाबा संस्थानच्या सेवाभावी कार्य व उपक्रमांविषयी माहिती दिली.बैठकीच्या सुरुवातीला दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार व कोकण विभागाच्या उपसंचालक दिवंगत अर्चना शंभरकर यांच्या दुःखद निधनाबद्दल श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. राज्य अधिस्वीकृती समितीचे कार्यालयीन कामकाज पाहणारे माहिती व जनसंपर्क म हासंचालनालयातील अधीक्षक संजय महाले हे पुढील महिन्यात सेवानिवृत्त होत आहेत. त्यानिमित्त समितीचे अध्यक्ष यदु जोशी व माहिती संचालक डॉ. गणेश मुळे यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला.

## चिमूर तालुक्यातील ८१ ग्रामपंचायतींवर प्रशासक राज; सरपंचच कारभारी

### गट विकास अधिकाऱ्यांचे आदेश निर्गमित

**अक्षराज : नितेश जाधव**

**दि.०८, चिमूर (चंद्रपूर) :** तालुक्यातील ज्या ग्रामपंचायतींची मुदत जानेवारी २०२६ ते डिसेंबर २०२६ या कालावधीत संपली आहे किंवा २८ फ ेब्रुवारी २०२६ पर्यंत संपणार होती, अशा एकूण ८१ ग्रामपंचायतींवर प्रशासकाची नियुक्ती करण्यात आली आहे.

निवडणूक प्रक्रिया प्रशासकीय कारणांमुळे पूर्ण होऊ न शकल्याने महाराष्ट्र ग्राम पंचायत अधिनियम ातील कलमान्वये हा निर्णय घेण्यात आला आहे. पंचायत समिती चिमूरचे गट विकास अधिकारी नितीन फुलझले यांनी याबाबतचे अधिकृत आदेश निर्गमित केले आहेत.

या आदेशानुसार, यापूर्वीचे काही प्रशासक नियुक्तीचे आदेश रद्द करून नवीन अटी व शर्तीनुसार यामध्ये प्रामुख्याने चिमूर तालुक्यातील ८१ गावांचा समावेश आहे.

मुदती अगोदर सरपंच पदावर असलेल्या सरपंचच प्रशासक म्हणून आता काम पहाणार आहेत. या नियुक्त्या मुंबई उच्च न्यायालय आणि शासनाच्या वेळोवेळी येणाऱ्या आदेशांच्या अधीन राहतील. ग्राम पंचायतींवर प्रशासक नियुक्त झाल्याने आता स्थानिक विकास कामांची जबाबदारी या प्रशासकीय समित्यांवर असणार आहे.

प्रशासक नियुक्तीच्या मुख्य अटी व शर्तीः कार्यकाळः ही नियुक्ती ६ महिन्यांच्या कालावधीसाठी किंवा नवीन ग्रामपंचायत निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत (यापैकी जे आधी असेल) लागू राहील. प्रशासकीय समिती म्हणून ग्रामपंचायतीचे कामकाज सुरळीत चालवण्यासाठी विद्यमान उपसरपंच आणि सदस्यांची 'प्रशासकीय समिती' स्थापन करण्याचे निर्दे श देण्यात आले आहेत.

**जबाबदारी :** प्रशासक कालावधीत ग्रामपंचायतीम ध्ये कोणताही अपहार किंवा अनियमितता आढळल्यास प्रशासक, समिती आणि ग्रामसेवक यांना जबाबदार धरून त्यांच्यावर कडक कारवाई केली जाईल.

**अपात्रता :** जे सदस्य किंवा उपसरपंच पदावरून अपात्र ठरले आहेत, त्यांना या प्रशासकीय समितीत स्थान दिले जाणार नाही. प्रमुख गावांची यादी व नियुक्त प्रशासक (काही प्रमुख नावे): तालुक्यातील विविध गावांसाठी विस्तार अधिकारी आणि केंद्र प्रम ुखांची प्रशासक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

## राज्याच्या सर्वांगीण विकासाचा दूरदृष्टीपूर्ण संकल्प : आ.सुधीर मुनगंटीवार

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०७, चंद्रपूर :** महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज विधानसभेत सादर केलेला राज्याचा अर्थसंकल्प हा सर्वसमावेशक, विकासाभिमुख आणि राज्याच्या सर्वांगीण प्रगतीचा मार्ग प्रशस्त करणारा असल्याची प्रतिक्रिया माजी अर्थमंत्री आ. सुधीर मुनगंटीवार यांनी व्यक्त केले आहे. शेतकरी, उद्योग, पायाभूत सुविधा, रोजगार, पर्यावरण आणि सांस्कृतिक वारसा या सर्व क्षेत्रांचा समतोल विचार करून सादर करण्यात आलेला हा अर्थसंकल्प राज्याला विकासाच्या नव्या उंचीवर नेणारा ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सबका साथ, सबका विकास, सबका विश्वास या धोरणाचे प्रतिबिंब या अर्थसंकल्पात असल्याचे आ. मुनगंटीवार यांनी म्हटले आहे.

आ. सुधीर मुनगंटीवार यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे मनःपूर्वक अभिनंदन करत सांगितले की, राज्यातील शेतकरी वर्गाला दिलासा देणाऱ्या कर्जमाफीसारख्या निर्णयांमुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेला मोठी चालना मिळणार आहे. शेती हा महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेचा कणा असल्याने शेतकऱ्यांच्या हिताला प्राधान्य देणारा हा निर्णय अत्यंत स्वागतार्ह असून लाखो शेतकऱ्यांना नव्या उमेदीने उभे राहण्याची संधी मिळेल.



याशिवाय उद्योग क्षेत्राला चालना देणाऱ्या तरतुदी, रोजगारनिर्मितीला गती देणारे उपक्रम, पायाभूत सुविधा बळकट करणारे प्रकल्प, शिक्षण व आरोग्य क्षेत्रातील गुंतवणूक तसेच पर्यावरण संवर्धनासंबंधीचे निर्णय यामुळे महाराष्ट्राचा विकास अधिक व्यापक आणि शाश्वत होईल, असेही त्यांनी नमूद केले. ग्रामीण व शहरी भागातील संतुलित विकासाचा विचार या अर्थसंकल्पातून स्पष्टपणे दिसून येतो, असेही ते म्हणाले.

चंद्रपूर जिल्ह्याच्या दृष्टीनेही हा अर्थसंकल्प अत्यंत महत्त्वपूर्ण ठरल्याचे सांगताना आ. मुनगंटीवार यांनी विशेष आनंद व्यक्त केला. चंद्रपूर जिल्ह्याला सागवानाच्या समृद्ध वारशाची परंपरा लाभलेली आहे. या ऐतिहासिक व नैसर्गिक संपत्तीचे जतन, संशोधन आणि जनजागृती करण्याच्या उद्देशाने बल्लारपूर येथे टिम्बर म्यूझीअम – झायलेरियम स्थापन करण्याची घोषणा अर्थसंकल्पात करण्यात आली आहे. या निर्णयाचे आ. मुनगंटीवार यांनी मनापासून स्वागत केले.

# स्वच्छ व हरित नवी मुंबईचा जागर करीत महिला मिनी मॅरेथॉन संपन्न



**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.०७, नवी मुंबई :** जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून नवी मुंबई महानगरपालिकेच्या सहयोगाने डॉ.डी.वाय पाटील युनिव्हर्सिटी अंतर्गत स्कुल ऑफ हॉस्पिटॅलिटी ॲण्ड टुरिजम स्टडिज यांच्या माध्यमातून आयोजित करण्यात आलेल्या या महिला मिनी मॅरेथॉनमध्ये विविध वयोगटातील १३०० हून अधिक महिलांनी सहभागी होत हा उपक्रम यशस्वी केला.

महापौर सुजाता पाटील आणि महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झालेल्या या महिला मिनी मॅरेथॉनद्वारे स्वच्छ व हरित नवी मुंबई साकारण्याचा निश्चय करण्यात आला.

केंद्र सरकारच्या स्वच्छ भारत मिशन अंतर्गत गृहनिर्माण तथा शहरी कार्य मंत्रालय, भारत सरकार यांचेमार्फत प्राप्त सूचनांस अनुसरून आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त १४ मार्चपर्यंत विविध उपक्रम आयोजित करण्यात येत आहेत.

या उपक्रमाचा एक भाग म्हणून लोकसहभागातून आयोजित करण्यात आलेली ही महिला मिनी मॅरेथॉन डॉ. डि.वाय. पाटील विद्यापीठाचे कुलपती डॉ. विजय डी. पाटील यांच्या संकल्पनेतून, उपाध्यक्ष डॉ. शिवानी पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीरित्या राबविण्यात आली. डॉ. डि.वाय. पाटील स्टेडियमपासून सुरू करण्यात आलेली ही ५ किमी. अंतराची महिला मिनी मॅरेथान नवी ऊर्जा देणारी असते असे मत सहभागी महिला धावपटूंनी व्यक्त केले.

यावेळी शुभेच्छा देताना महापौर सुजाता पाटील यांनी जागतिक महिला दिन प्रतिकात्मक रितीने एक दिवस साजरा केला जात असला तरी प्रत्येक दिवस हा महिलांच्या सन्मानाचा असतो असे सांगितले. स्त्रीला नवनिर्मितीचे वरदान असते त्यामुळे स्त्रीशक्तीचा जागर अशा कार्यक्रमांतून होत असल्याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले. याप्रसंगी घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपआयुक्त डॉ.अजय गडदे, क्रीडा विभागाच्या उपआयुक्त अभिलाषा म्हात्रे आणि इतर मान्यवर उपस्थित होते. या महिला मिनी मॅरेथॉनमध्ये निधी कनोजिया हिने प्रथम पारितोषिक पटकाविले. तसेच भूमी म्हात्रे यांनी द्वितीय व एकता राजभर यांनी तृतीय क्रमांक पटकाविला. ५ कि.मी. अंतराच्या 'घे भरारी' शिर्षकांतर्गत आयोजित या महिला मिनी मॅरेथॉनमध्ये विविध वयोगटातील १३०० हून अधिक महिलांनी उत्साहाने सहभागी होऊन स्वच्छतेचा संदेश प्रसारित केला व आरोग्यपूर्ण जीवनाचे महत्वही अधोरेखीत केले.

# मुंबई पोलिसांना मिळणार अमेरिकन स्टाईल बॉडी-वॉर्न कॅमेरे

**अक्षराज : संजय पंडित**

**दि.०७, मुंबई :** पोलिसांच्या कामकाजात पारदर्शकता वाढवण्यासाठी मुंबई पोलिसांकडून एक महत्त्वाचे पाऊल उचलले जाणार आहे. लवकरच इमर्जन्सी कॉल वर सर्वप्रथम पोहोचणाऱ्या पोलिसांना आधुनिक तंत्रज्ञानाने सुसज्ज उपकरणे देण्याची तयारी सुरू आहे.

पोलिसांच्या कामकाजाचे रेकॉर्डिंग करण्यासाठी त्यांना विशेष कॅमेरे देण्याची योजना आखली जात आहे. या कॅमेऱ्यामुळे घटनास्थळी घडणाऱ्या प्रसंगांचा डिजिटल पुरावा उपलब्ध होऊ शकणार आहे. यामुळे पोलिसांच्या वर्तना बाबत येणाऱ्या तक्रारींची निष्पक्ष चौकशी करणे अधिक सोपे होणार आहे.

इमर्जन्सी कॉलवर सर्वात आधी पोहोचणाऱ्या मुंबई पोलिसांना लवकरच बॉडी-वॉर्न कॅमेरे मिळणार आहेत. पोलिसांच्या गणवेशावर लावले जाणारे हे कॅमेरे त्यांच्या कामकाजाचे थेट रेकॉर्डिंग करणार असून त्यामुळे पोलिसांच्या कार्यप्रणालीत अधिक पारदर्शकता येणार आहे. अमेरिकेसारख्या विकसित देशांमध्ये अशा प्रकारचे बॉडी कॅमेरे वापरले जातात आणि त्याच धर्तीवर महाराष्ट्र पोलिसांमध्येही ही प्रणाली लागू करण्याची तयारी सुरू आहे. यामुळे घटनास्थळी घडणाऱ्या प्रत्येक गोष्टीची नोंद ठेवणे शक्य होणार आहे.



**आता पोलिसांच्या प्रत्येक हालचालीवर नजर**

अलीकडच्या काळात पोलीस आणि वाहतूक पोलिसांवर हल्ले होण्याच्या घटना वाढताना दिसत आहेत. अनेकदा अशा घटनांमध्ये नेमके काय घडले यावर वाद निर्माण होतात. या पार्श्वभूमीवर पोलिसांच्या सुरक्षिततेसाठी आणि घटनांची अचूक नोंद ठेवण्यासाठी राज्य सरकारने आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्याचा निर्णय घेतला आहे.

बॉडी-वॉर्न कॅमेऱ्यांमुळे पोलिसांच्या कामकाजाचे व्हिडिओ रेकॉर्डिंग उपलब्ध होईल, ज्यामुळे वादग्रस्त परिस्थितीत सत्य परिस्थिती समजणे अधिक सोपे होणार आहे. सध्या सुरुवातीच्या टप्प्यात २३० बॉडी-वॉर्न कॅमेऱ्यांची खरेदी प्रक्रिया सुरू झाली आहे. भविष्यात या कॅमेऱ्यांची संख्या वाढवून अधिकाधिक पोलिसांना ही सुविधा दिली जाणार आहे.

पोलीस अधिकाऱ्यांनी सांगितले की, कॅमेऱ्यांतील रेकॉर्डिंग मधून स्थिती स्पष्ट होते, यामुळे वाद-विवादाची स्थिती कमी होते. यामुळे निष्पक्ष तपासही केला जाऊ शकतो. या कॅमेऱ्यांमुळे पोलिसांचे वागणेही रेकॉर्ड होणार आहे. जर पोलीस कर्मचा-याच्या वर्तणुकीची तक्रार आली, तर रेकॉर्डिंगच्या आधारे त्याची सत्यता तपासली जाणार आहे. अत्यावश्यक कॉलवर सर्वात आधी पोलीस कर्मचारी पोहोचतात. अशा स्थितीत परिस्थिती हाताळणे खूपच महत्त्वपूर्ण ठरते. बॉडी-वॉर्न कॅमेरे घटनेचे रेकॉर्डिंग करतात.

यामुळे डिजिटल पुरावा तयार होतो. न्यायालयीन कारवाई वेळी अथवा अंतर्गत समीक्षेवेळी हे खूपच उपयुक्त ठरणार आहे. अशा प्रकारे सायबर सुरक्षा धोरणानुसार, राज्य मजबूत सुरक्षा निश्चित करण्यासाठी आधुनिक डेटा सेंटर बरोबरच आपला डेटा सुरक्षा ढांचा अधिक मजबूत होणार आहे. मुंबईमध्ये १,१५० एआई-सक्षम सीसीटीव्ही कॅमेरे लावले जाणार आहेत.यामध्ये ५०० विद्यमान युनिट. मधील कॅमेरे देखील अपग्रेड केले जाणार आहेत.

# मानव-वन्यजीव संघर्षावर करडईचा उतारा!

## कृषी विभागाच्या सहकार्यातून शेतकऱ्यांनीच शोधला अभिनव पर्याय

**अक्षराज : नितीन पाटील**

**दि.०८, चिमूर (चंद्रपूर) :** ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पालगत मानव-वन्यजीव संघर्षाने टोक गाठले असताना, मासळ परिसरातील शेतकऱ्यांनी कृषी विभागाच्या मार्गदर्शनात यावर प्रभावी तोडगा शोधून काढला आहे. पारंपरिक पिकांना फाटा देत यंदा शेतकऱ्यांनी करडई या तेलबियांच्या पिकाची मोठ्या प्रमाणावर लागवड केली असून, जवळपास २०० एकर क्षेत्रावर करडईचे पीक फुलले आहे. आतापर्यंतचा हा विक्रमी आकडा ठरला आहे.

वन्यप्राण्यांच्या सततच्या उपद्रवामुळे शेती करणे दिवसेंदिवस कठीण होत चालले आहे. वाघ, बिबट, अस्वल, रानडुक्कर, हरीण व रानकुत्र्यांमुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे. पिके उद्ध्वस्त होणे, रात्रंदिवस पहारा देण्याची वेळ येणे आणि जीवितहानीचा धोका - या साऱ्यांमुळे शेतकरी हवालदिल झाले होते.

मात्र, यावर शेतकऱ्यांनी कृषी विभागाच्या यशस्वी मार्गदर्शनातून करडईचा पर्याय शोधून काढला. काटेरी, कमी खर्चिक, कमी पाण्यावर येणारे आणि वन्यप्राण्यांना फारसे आकर्षित न करणारे हे पीक ठरत असल्याने शेतकऱ्यांचा कल मोठ्या प्रमाणात करडईकडे वळला आहे. चणा, उडीद, मूग, जवस यांसारख्या पारंपरिक कडधान्यां ऐवजी आता करडई शेतीत आघाडीवर आहे.

ताडोबा बफर व कोअर झोनला लागून असलेल्या मासळ परिसरात वन्यजीवांचा वावर नेहमीच वाढलेला असतो. अशा परिस्थितीत रासायनिक खते, बियाणे, मजुरी यांचा वाढता खर्च आणि वन्यप्राण्यांमुळे होणारे नुकसान यामुळे शेतकरी पुरता मेटाकुटीला आला होता. मात्र करडईच्या लागवडीमुळे खर्च कमी, नुकसान नगण्य आणि उत्पादन स्थिर राहण्याची आशा निर्माण झाली आहे.

मानव-वन्यजीव संघर्षाच्या पार्श्वभूमीवर करडई हे संकटावरचे नवे उत्तर ठरत असून, शेतकऱ्यांचा आत्मविश्वास पुन्हा उभा राहत आहे.

शेतीतूनच संघर्षावर मात करण्याचा हा प्रयोग इतर भागांसाठीही प्रेरणादायी ठरण्याची चिन्हे आहेत.

**- प्रयोगाची पार्श्वभूमी आणि कृषी विभागाचे योगदान...**

मासळ आणि परिसरात प्रामुख्याने धान हे मुख्य पीक घेतले जाते मात्र धानाच्या कापणीनंतर शेतजमीन पडीक न ठेवता रब्बी हंगामात कमी ओलाव्यावर येणाऱ्या तसेच जंगली जनावरांमुळे नुकसान न होणाऱ्या करडई पिकाची लागवड करण्याचे आवाहन कृषी विभागाने केले होते . शेतकऱ्यांनी प्रतिसाद देत मासळ परिसरातील मोठ्या क्षेत्रावर करडईची लागवड केली. पेरणी पासून ते खत व्यवस्थापनापर्यंत उपकृषी अधिकारी आणि सहाय्यक कृषी अधिकाऱ्यांनी वेळोवेळी प्रत्यक्ष बांधावर जाऊन मार्गदर्शन केले. करडई हे पीक अत्यंत कमी पाण्यात येत असल्याने उपलब्ध ओलाव्याचा वापर करून हे पीक कसे घ्यावे याचे प्रात्यक्षिक शेतकऱ्यांना देण्यात आले तसेच मावा व अळीसारख्या किडींपासून पिकाचे संरक्षण करण्यासाठी फवारणीबद्दल योग्य ते मार्गदर्शन करण्यात येत आहे.

**- शेतकऱ्यांचा वाढता कल**

मासळ सातारा कोलारा हा परिसर ताडोबा अभयारण्याचा जवळ असल्यामुळे वन्य प्राण्यांच्या नुकसानापासून संरक्षण मिळणाऱ्या पिकाला शेतकऱ्यांचा त्वरित प्रतिसाद मिळाला परिणामी मासळ आणि परिसरातील शेतकऱ्यांनी या मोहिमेमध्ये सहभाग नोंदवला. पूर्वी रब्बी हंगामात शेतकरी केवळ हरभरा किंवा लाखोळी आणि कमी प्रमाणात गहू हे पीक घेत असत मात्र यावेळी प्रथमच एवढ्या मोठ्या प्रमाणावर करडईची लागवड झाल्याने शेतकऱ्यांचा आणि कृषी विभागाचादेखील उत्साह वाढला आहे.



❶ धान कापणीनंतर शेत रिकामे राहण्यापेक्षा कृषी विभागाच्या सल्ल्याने आम्ही करडई लावली या पिकाला खर्च कमी असून काट्यांमुळे वन्य प्राण्यांचा (उदा. रानडुक्कर) त्रासही कमी होतो आणि कमी पाण्यात हे पीक चांगल्या पद्धतीने येते.

करडईच्या पेरणी पासून ते खत व्यवस्थापन पाणी व्यवस्थापन तसेच कीड व रोग नियंत्रणाबाबत कृषी विभागाचे उप कृषी अधिकारी रुपेश सोनवणे तसेच सहाय्यक कृषी अधिकारी बळीराम येवले यांचे आम्हाला वेळोवेळी मार्गदर्शन लाभत आहे, सध्या पीक वाढीच्या अवस्थेत असून फुलोऱ्याची वाट पाहत आहोत.

**- अमित गंधारे, शेतकरी**

❷ सध्या मासळ परिसरातील दीडशे ते दोनशे एकर वरील हे करडई पीक शाकीय वाढीच्या अवस्थेत आले असून येत्या काही दिवसात फुलोरा अवस्थेत येईल, दरम्यानच्या काळात शेतकऱ्यांनी पाण्याचा संतुलित वापर आणि मावा तसेच पाने खाणाऱ्या अळीपासून पिकाचे संरक्षण करावे.

**- रुपेश सोनवणे, उप कृषी अधिकारी**

# थोडक्यात

## शिरवळच्या विद्यार्थीनीची एन्स्पायर मानक अवार्ड २०२५-२६ वर्षात निवड

**अक्षराज : बाळू धायगुडे**



**दि.०७, खंडाळा (सातारा) :** रयत शिक्षण संस्थेचे, रयत इंग्लिश मिडीयम स्कूल, शिरवळ येथील इयत्ता १० वी ची विद्यार्थिनी कु.पिसाळ श्रावणी समीर हिच्या प्रकल्पाची इन्स्पायर मानक ॲवार्ड २०२५-२६ या शैक्षणिक वर्षात निवड झाली. विज्ञान विषयातील अभिनव व उपयुक्त संकल्पनेवर आधारित तिच्या प्रकल्पाची निवड करण्यात आली असून त्यामुळे शाळेचे नाव उज्ज्वल झाले आहे.

ही योजना भारत सरकारच्या विज्ञान आणि तंत्रज्ञान विभाग (DST) आणि नॅशनल इनोव्हेशन फाउंडेशन (NIF) द्वारे राबवली जाणारी एक महत्त्वाची योजना आहे. शालेय विद्यार्थ्यांमध्ये कल्पकता आणि विज्ञानाची आवड निर्माण करणे हा याचा उद्देश आहे.

**मुख्य वैशिष्ट्ये :-** निवड झालेल्या प्रत्येक विद्यार्थ्याला त्यांच्या कल्पनेचे मॉडेल (प्रतिकृती) बनवण्यासाठी ₹१०,००० थेट त्यांच्या बँक खात्यात जमा केले जातात.

**निवड प्रक्रिया :-** शाळा स्तरावरून निवडलेले विद्यार्थी जिल्हा, राज्य आणि शेवटी राष्ट्रीय स्तरावरील प्रदर्शनात सहभागी होतात. कु.श्रावणी हिने विज्ञान विभागातील शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली परिश्रमपूर्वक हा प्रकल्प साकारला. या यशाबद्दल विज्ञान विभागाच्या शिक्षिका राऊत आर.वाय. व शिक्षक गिरे जी.एस. यांचे विशेष अभिनंदन करण्यात आले. तसेच शाळेच्या मुख्याध्यापिका मांढरे व्ही.एस. व समन्वयक घाडगे व्ही. एस. तसेच रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य आप्पासाहेब देशमुख यांनी विद्यार्थिनीचे कौतुक करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. कु.श्रावणीच्या या उल्लेखनीय कामगिरीमुळे शाळा व पालकांमध्ये आनंदाचे वातावरण असून भविष्यातही विद्यार्थ्यांनी अशाच प्रकारे यश संपादन करावे, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.

## चिमुकल्या बालकांचा बालकोत्सव संपन्न

**अक्षराज : प्रभाकर हजारे**



**दि.०७, मुंबई :** बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या जी /दक्षिण विभागातील बालवाडीच्या चिमुकल्या बालकांचा बालकोत्सव कार्यक्रम प्रशासकीय अधिकारी वर्षा गांगुर्डे यांच्या प्रमुख उपस्थितीत लोअर परळ मुंबई येथील तालचेकरवाडी मनपा शाळेच्या सभागृहात नुकताच संपन्न झाला. यावेळी लोकसहभाग कक्षाचे उपशिक्षणाधिकारी मुक्तार शाह यांची ही विशेष उपस्थिती होती. याबाबत सविस्तर माहिती अशी की, गेल्या महिन्यातच मनपा प्राथमिक शाळांच्या विद्यार्थ्यांचा बालकोत्सव कार्यक्रम पार पडला होता.मोठ्या मुलांच्या बालकोत्सव कार्यक्रमात बालवाडीच्या चिमुकल्या बालकांना मात्र कुठेही सहभागी होता येत नाही, याची खंत प्रशासकीय अधिकारी वर्षा गांगुर्डे यांना वाटल्याने त्यांनी या चिमुकल्या बालकांसाठी ही बालकोत्सव कार्यक्रम आयोजित करण्याचा निर्धार केला. आणि तात्काळ या चिमुकल्या बालकांसाठी व्यासपीठ उपलब्ध करून देण्याचे ठरवले.विभागातील सर्व शाळांचे इन्चार्ज शिक्षक,स्पेशल शिक्षक यांची तातडीची मीटिंग घेऊन या कार्यक्रमाच्या आयोजन व नियोजना बाबत मार्गदर्शक सूचना दिल्या.या बालकोत्सवासाठी जी/दक्षिण विभागातील तब्बल चोवीस बालवाड्यांनी सहभाग घेतला. सकाळ सत्रातील १२ आणि दुपार सत्रातील बारा बालवाड्यानी या बालकोत्सवामध्ये सहभाग घेतला. सकाळ सत्रातील तीन आणि दुपारी सत्रातील तीन अशा सहा बालवाड्यांना प्रथम,द्वितीय व तृतीय क्रमांकाची आकर्षक ट्रॉफी बक्षीस देऊन प्रशासकीय अधिकारी वर्षा गांगुर्डे यांनी विद्यार्थ्यांना सन्मानीत केले.मानपाच्या सेवानिवृत्त शिक्षिका नम्रता सावंत आणि दिपाली चव्हाण यांनी या नृत्य स्पर्धेचे उत्तम परीक्षण केले. असा कार्यक्रम मनपामध्ये पहिल्यांदाच झाल्याने सर्व पालक व शिक्षक खूप आनंदी आणि खुश झाल्याचे दिसून आले. कार्यक्रमाला विभाग निरीक्षक सुरेश घिगे व पूनम शिंदे यांच्यासह विभागातील सर्व शाळांचे इन्चार्ज,स्पेशल शिक्षक, बालवाडी शिक्षिका,पालक आणि विद्यार्थी यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. तत्पुर्वी सकाळी संगीत शिक्षक चंद्रकांत साखरपेकर आणि विद्यार्थी यांनी दिप प्रज्वलन, ईशस्तवन व स्वागतगीत सादर केले.नंतर एकापेक्षा एक सरस नृत्य कार्यक्रम बालकांनी सादर करून उपस्थितांना गाण्याच्या तालावर ठेका धरायला भाग पाडले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विभागातील सर्व इन्चार्ज,स्पेशल शिक्षक,प्रशि.शिक्षक,यांनी मेहनत घेतली.तालचेकरवाडी मनपा शाळेच्या इमारतप्रमुख ललिता खंकाळ,आणि प्रशि. शिक्षिका पूजा चव्हाण यांनी या कार्यक्रमाचे उत्तम व्यवस्थापन केले. हरीश गिरीगोसावी,महेंद्र गुप्ता,विकास पासी,किरण पाटील,साधना माने, सुमित्रा,यमगेकर,सुजाता तडवी,रश्मी राणे,संजय माने,पूनम वाघमोडे,दीपक वैष्णव,संध्या कांबळे आणि नयना टिळेकर यांनी सहकार्य केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दैनिक अक्षराज चे पत्रकार प्रभाकर हजारे, संतोष कालकर व दत्तू पेडेकर यांनी केले. पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली.

## विंचूरमध्ये 'तुकाराम बीज' सोहळ्याचा उत्साह

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**



**दि.०७, विंचूर (नाशिक) :** येथील समस्त ग्रामस्थ विंचूर व पंचक्रोशीच्या वतीने श्री जगद्गुरु तुकाराम महाराज ३७६ व्या सदेह वैकुंठगमन (तुकाराम बीज) सोहळ्याचे भव्य आयोजन करण्यात आले आहे. हा भक्तिमय सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न झाला असून, संपूर्ण विंचूर परिसर विठुनामाच्या गजरात दुमदुमला. वारकरी विद्यार्थ्यांचा उत्साह या सोहळ्याचे विशेष आकर्षण म्हणजे नगरसुल (येवला) जवळील जमदाडे महाराज यांच्या ज्ञानोबाराय शिक्षण संस्थेतील सुमारे १२५ वारकरी विद्यार्थी. हे विद्यार्थी पालखी मिरवणुकीत अभंगांच्या तालावर विलोभनीय ठेका धरत आपली सेवा सादर कली. दुपारी ४:३० वा. भव्य पालखी मिरवणूक संपूर्ण विंचूर शहर.

सायंकाळी ७:०० वा. हरिकीर्तन सेवा ह.भ.प. भागिरथ महाराज काळे कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालय प्रांगण रात्री ८:३० वा. भव्य प्रसिद्ध कीर्तनकार ह भ प भागिरथ महाराज काळे यांची रसाळ कीर्तन सेवा (आळंदी देवाची) यांचे सुश्राव्य कीर्तन झाले. तुकोबारायांच्या जीवनकार्याचा गाढा व्यासंग असलेल्या महाराजांच्या वाणीतून अभंगांचे निरूपण ऐकण्याची पर्वणी विंचूरकरांना मिळाली. या मंगलमयी सोहळ्यात आणि महाप्रसादाचा लाभ घेण्यास विंचूर व परिसरातील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन समस्त ग्रामस्थ विंचूर व पंचक्रोशी यांच्या वतीने करण्यात आले होते.